जी. बी. नाईक आणि कंपनी यांनीं

वेळेचें महत्व आणि व्यय

या विषयावर मागितल्यांपैकीं
वीस निबंधांत उत्तम ठरलेला
बक्षिसाचा

निबंध.

दत्तात्रय मोरेश्वर लोहोकरे
यांनीं लिहिला.

सन १९०६.

किंमत ६ आणे.

Presented to
The Deccan Vernacular
Translation Society Poona
By
G. B. Naik & Company

Bombay
8th October 1906

बक्षिसाचा

वीस निबंधांत उत्तम ठरलेला

वेळेचें महत्व आणि व्यय

या विषयावरील

निबंध.

दत्तात्रय मोरेश्वर लोहोकरे

यांनीं लिहिला;

तो

मुंबईमध्यें,

जी. बी. नाईक आणि कंपनी

घड्याळाचे व जवाहिराचे व्यापारी

यांनीं

'निर्णयसागर' छापखान्यांत छापून प्रसिद्ध केला.

१९०६.

किंमत ६ आणे.

प्रस्तावना.

'वेळेचें महत्व आणि व्यय' हा विषय फार व्यापक आणि महत्वाचा विषय आहे. रंकापासून रावापर्यंत, पांच वर्षांच्या मुलापासून तों नव्वद वर्षांच्या वृद्ध आजोबापर्यंत, आणि अगदीं निरक्षर खेडवळापासून तों तहत सर्व प्रसिद्ध अशा महापंडितापर्यंत प्रत्येक व्यक्तीशीं या विषयाचा संबंध आहे. व्यापकत्वामुळें याचें महत्वहि अतिशय आहे. स्वकर्तव्याचा व्यापार करण्याकरितां परमेश्वरानें वेळ हें भांडवल आह्मां मुनिमांना दिलें आहे. ज्याच्या त्याच्या व्यापारावर आमची उन्नति अवलंबून आहे. सन्मार्गानें जाईल तो उन्नतिशिखरावर आरूढ होईल; आणि जो या व्यापारांत अफरातफर करील तो ठार बुडेल. ह्या अमूल्य मुद्दलाचा योग्य विनियोग करणारा आणि त्याची उधळपट्टी करणारा या दोघांच्या स्थितिवैचित्र्यावर आंग्लकवि काऊपर यानें फार मार्मिक व बहारीचें रूपक केलें आहे; त्यांत तो ह्मणतो :—

Time as he passes us, has a dove's wing,
Unsoiled and swift and of a silken sound;
But the World's Time is time in masquerade.
Theirs, should I paint him, has his pinions fledged
With motley plumes; and where the peacock shows

His azure eyes, is tinctured black and red
With spots quadrangular of diamond form,
Ensanguined hearts, clubs typical of strife,
And spades, the emblems of untimely graves.
What should be, and what was an hour-glass once,
Becomes a dice box, and a billiard mast
Well does the work of his destructive scythe.
Thus decked, he charms a world whom fashion blinds
To his true worth, most pleased when idle most
Whose only happy are their wasted hours.

आमच्याजवळून काळ जात असतां त्याला निर्मल, वेगवान् आणि सौम्य आवाज करणारे असे कबुतराचे पंख असतात; परंतु दुनियेचा काळ छद्मवेषी आहे. त्याचें जर चित्र काडलें तर तें असें असतें. त्याला चित्रविचित्र अशा अनेक रंगांचा पिसारा असतो. मोराच्या पिसाऱ्यावर जे अस्मानी रंगाचे डोळे असतात, त्यांच्या ऐवजीं चतुष्कोनी व पिंपळ-पानाच्या आकाराचे लाल भडक ठिपके (पत्त्यांतील चौकट आणि लाल बदाम) आणि कलहसूचक अशा बदामाच्या आकृतीचे व अकालिक मृत्युदर्शक अशा कुदळीच्या किंवा टिकावाच्या आकृतीचे काळे डाग (इस्पिक व फुलवर) हे याच्या पिसाऱ्यावर असतात; जें कालदर्शक यंत्र होतें आणि असावें त्याची फांशांची पेटी बनते; गोट्यांच्या खेळांतील काठी त्याच्या नाशकारक विळयाचें काम छान बजावते; अशा प्रकारें सजून, जनरूढीमुळें वेळेचें खरें मोल जे जाणत नाहींत, खूप सुस्तावले ह्मणजे ज्यांना ब्रह्मानंद, रिकामटेकडेपणा हेंच ज्यांचें सुख अशा विषयीजनांस हे राजश्री भुलवून टाकितात. तात्पर्य, वेळेचा एक एक क्षण किती मोलाचा आहे आणि त्याचा व्यय कसा करावा हें कळलें तरच मनुष्याचें

आयुष्यक्रमण चांगलें होईल. असल्या व्यापक आणि महत्वाच्या विषयावर मराठी भाषेंत स्वतंत्र पुस्तक अद्याप झालें नाहीं; ती उणीव अंशतः भरून काढण्याकरितां व केवळ लेखकमंडळीस उत्तेजन देण्याचे हेतूनेंच नव्हे तर मेसर्स जी. बी. नाईक आणि कंपनीचे उत्पादक रा. रा. गणपतराव भिवाजी नाईक यांची उद्योगशीलता आणि वेळेचा निरर्थक व्यय न होऊं देण्याची लालसा पाहून कंपनीनें बक्षीस लावून सदर विषयावर निबंध मागितल्यावरून हा निबंध लिहिला आहे.

निबंधाचे एकंदर सहा भाग केले आहेत. पहिल्या भागांत प्रथमतः वेळेचें सामान्य स्वरूप सांगून व तिच्या तीन विभागांचें वर्णन करून नंतर मानवजातीच्या क्षणभंगुरत्वामुळें एकंदर वेळेला किती महत्व प्राप्त झालें आहे हें दाखविलें आहे. दुसऱ्या भागांत मनुष्याचें मुख्य कर्तव्य काय, त्याचे प्रयत्न कोणत्या दिशेनें चालले आहेत, वेळेचा व्यय किती प्रकारें होतो, याचा विचार केला आहे. तिसऱ्या भागांत आयुष्यांत रिकामा वेळ किती सांपडतो, आळसामुळें कसें जबरदस्त नुकसान होत आहे, लोभ महत्वाकांक्षादि मनोविकारांस बळी पडून, कांहींजण आपल्या वेळेचा कसा दुरुपयोग करितात, हें सांगितलें आहे. चौथ्या भागांत आयुष्याचा दुर्व्यय होण्याचीं आणखी कांहीं कारणें दिलीं आहेत. पांचव्या भागांत 'सुख कशापासून मिळेल?' या प्रश्नाचा यथामति ऊहापोह केला आहे; व सहावा भाग वेळेचा सद्व्यय कसा करावा याविषयींचा आहे. शेवटीं परिशिष्टांत विषयानुरूप कांहीं उतारे दिले आहेत.

"जीवितकर्तव्य कोणतें?" याच प्रश्नाचा निबंधांत मुख्यतः विचार केला आहे. स्वतःच्या कर्तव्याची ओळख न पटल्यामुळेंच पुष्कळ वेळ व्यर्थ धांवाधांव करण्यांत जातो; आणि म्हणूनच निबंधाचा मुख्य रोंख तिकडे फिरवून 'निजावें केव्हां?' 'जेवणाला किती वेळ द्यावा?' 'पोटाचा

उद्योग किती तास करावा ?' या व अशाच प्रकारच्या दुसऱ्या कित्येक प्रश्नांचा फारसा विचार केला नाहीं. कर्तव्यकर्म कळल्यावर ह्या गोष्टी सहज घडून येतात. मग 'अमुक तास खेळावें', 'अमुक वेळ वाचावें', अशा प्रकारचे नियम दुसऱ्यानें घालून देण्याची आवश्यकता नाहीं. ज्याचा तो स्वतः तयार असतोच.

मेसर्स जी. बी. नाईक आणि कंपनी यांनीं जन्मभाषेची थोडीशी सेवा करण्याचा हा प्रसंग आणून दिला आणि निबंधाचें पुस्तक छापण्यापूर्वी आणखी कांहीं उपयुक्त माहिती देऊन मूळ निबंधांत अनेक सुधारणा करण्यास पुष्कळ सवड दिली, त्यामुळें या निबंधाला आणखी भर पडली, यांबद्दल मी त्यांचा ऋणी आहें. तसेंच रा. रा. नरसिंह चिंतामण केळकर 'मराठा' पत्राचे संपादक यांनीं एकंदर निबंधपरीक्षकाचें काम केल्याबद्दल आणि 'केरळकोकिळ'चे संपादक व गु. रा. रा. रामचंद्र विष्णु जोशी, अहमदनगर ए. सोसायटीचे हायस्कुलांतील शिक्षक, यांनीं निबंधाचा हस्तलेख कृपा करून वाचून पाहिल्याबद्दल मेसर्स जी. बी. नाईक आणि कंपनीतर्फे यांचे आभार मानतों.

असो, हा पहिलाच प्रयत्न असल्यामुळें त्यांत अनेक दोष असतील, म्हणून सुज्ञ वाचकवर्गाजवळ—

"येथें जें न्यून पूर्ण । तें सज्जनीं घ्यावें सांभाळून" एवढेंच मागणें आहे. प्रस्तुत कृतींतील दोष कोणीं कृपा करून कळविल्यास निबंधलेखक त्याचा फार आभारी होईल. सरतेशेवटीं ज्याच्या कृपेनें ह्या चार ओळी लिहिण्याचें काम पार पडलें त्या दयाघन श्रीरामचंद्रास प्रणाम करून व त्याच्या चरणीं हें प्रथम पुष्प अर्पून ही प्रस्तावना संपवितों.

नेर परसोपंत, वऱ्हाड,
विजयादशमी १८२८. } **दत्तात्रय मोरेश्वर लोहोकरे.**



वेळेचें महत्व आणि व्यय.



भाग १.



वेळेचें महत्व.

आयुर्नश्यति पश्यतां प्रतिदिनं याति क्षयं यौवनं ।
प्रत्यायांति गताः पुनर्न दिवसाः कालो जगद्भक्षकः ॥

श्रीमच्छंकराचार्य.

काळ ह्मणजे काय?—त्याचें वर्णन अशक्य—त्याचे विभाग-भूत-भविष्य-वर्तमान-क्षण-त्याची उपेक्षा-जीवित.

१ काळ ज्याला माहित नाहीं असा एकहि मनुष्य भूतलावर नाहीं; तरी पण 'काळ ह्मणजे काय?' असें एखाद्याला विचारल्यास त्याला त्याचें उत्तर देतां यावयाचें नाहीं. दशेंद्रियांपैकीं कोणत्याहि इंद्रियास तो गोचर नाहीं, यावरून तो इंद्रियातीत आहे असें ठरतें. काळ नाहीं असें कोणासहि ह्मणतां येणार नाहीं; कारण तो जर नसता, तर 'काल,' 'आज,' 'उद्यां,'

'महिना,' 'वर्ष,' हे शब्दच प्रचारांत आले नसते. शब्दांची कथा काय? सृष्टि तरी असती कीं नसती याची शंकाच आहे. कारण सृष्टींतील कोणत्याही पदार्थाचें आयुष्य ह्मणजे कालाचाच एक अल्पसा विभाग होय. कालानें बहुतेक सर्व कांहीं मोजतां येतें, परंतु त्याला मोजूं शकणारें असें माप नाहीं. तीनशें साठ दिवसांचें 'वर्ष' लहान ह्मणून 'शतक' नांवाचें माप काढलें; तेंहि अपुरें पडलें ह्मणून 'युग' निघालें. पुढें 'प्रलय,' 'महाप्रलय' हींहि मापें निघालीं; तरी काळमहाराजांना मोजून टाकण्याचें एकालाहि सामर्थ्य नाहीं. तो केव्हांपासून आहे आणि पुढें कोठपर्यंत राहणार याची नुसती अटकळ देखील बांधितां येणार नाहीं. श्रीमद्भगवद्गीतेंत 'कालोऽस्मि–(मी काळ) असें ह्मटलें आहे; त्यावरून परमेश्वराचीं अगाधत्व, अनाद्यनंतत्व हीं या कालाचे ठायीं आहेत हें सिद्ध होतें.

२ ज्याचें स्वरूप अवर्णनीय आहे, जो मनोबुद्धींद्रियातीत आहे, श्रुति सुद्धां ज्याचें 'नेति,' 'नेति' असें वर्णन करितात, कल्पनातीत प्रचंड परिघाच्या अगणित सूर्यमाला ज्या विश्वांत आहेत, अशीं असंख्य विश्वें जो कल्पनेनें रचितो आणि मोडितो तो सर्वसमर्थ परमात्माच ह्मणजे हा काळ! एका विश्वाच्या मानानें पाहतां मनुष्यासारख्या कीटकवत् प्राण्यानें सकलचराचरव्यापि परमात्मस्वरूप कालाची महती वर्णन करणें कधीं तरी शक्य आहे काय? तरी पण अनेक बुद्धिमान् व ज्ञानी पुरुषांनीं त्याचें आपापल्या परीनें वर्णन करून ठेविलें आहे; त्यावरून त्याचें महत्व यथाशक्ति ओळखून तदनुसार वर्तन ठेवणें हें आपणांपैकीं प्रत्येकास अवश्य आहे.

३ वेळेचे वर्तमान, भूत, आणि भविष्य असे जरी तीन विभाग पडतात तरी विस्ताराकडे पाहतां मुख्य भाग दोनच होतातः एक भूतकाळ,

व दुसरा भविष्यकाळ. वर्तमानकाळ या दोहोंपेक्षां फार महत्वाचा आहे, तरी त्याची व्याप्ति चालू क्षणापलीकडे नाहीं. कारण चालू क्षण संपला कीं तो भूतकाळचा झाला; आणि पुढें येणारा तो भविष्यकाळचा आहे. आपण आतां यांपैकीं प्रथम भूतकाळ, नंतर भविष्यकाळ आणि शेवटीं वर्तमान काळ असा क्रमाक्रमानें यांचा विचार करूं.

४ भूतकाळाचा विस्तार इतका मोठा आहे कीं, त्याची आपणांस कल्पनाच होणें नाहीं. विश्वाचें आदितत्व जेव्हांपासून अस्तित्वांत आलें तेव्हांपासून तो आहे. ह्मणजे मनुष्याचें स्थूल शरीर आणि अवयव हीं जशीं एकाच वेळीं उत्पन्न होतात, त्यांत जसें शरीर आधीं व नंतर अवयव किंवा आधीं अवयव व मग शरीर असें कांहींच ह्मणतां येणार नाहीं, त्याचप्रमाणें वेळ आणि विश्वाचें आदिकारण हीं दोन्ही एकसमयावच्छेदेंकरून उत्पन्न झालीं आहेत. त्या आदिकारणाच्या उदयापासून तों नुकत्याच संपलेल्या क्षणापर्यंत भूतकाळाचा विस्तार आहे! या भूतकालांत वाली, रावण, दुर्योधन इत्यादिकांसारख्या दुष्ट, महाबलाढ्य, व मानधनाग्रणी राजांचा चुराडा झाला; हरिश्चंद्र, राम, युधिष्ठिर, छत्रपति शिवाजी यांसारखे न्यायी, शूर, कर्तव्यक्षम, व सत्यपालनाविषयीं दक्ष असे धर्मात्मेहि गत झाले; अर्जुन, वृषकेतु, राणा प्रतापसिंह, मुरार बाजी, बाजी देशपांडे, तानाजी मालुसरे, पहिले बाजीराव, जयाप्पा शिंदे यांसारखे रणधुरंधर योद्धे, कर्णासारखे दानशूर पुरुष, शकुनीसारखे कलहप्रिय कपटपटु, तैमूरलंग, नादिरशहा, औरंगझेब, यांसारखे क्रूर व जुलमी राजे, सॉक्रेटीस, शंकराचार्य, श्रीज्ञानेश्वर महाराज, श्रीतुकाराम महाराज, यांसारखे साधु व तत्त्ववेत्ते, भीमासारखे वज्रदेही मल्ल, अहल्या, सीता, राणी लक्ष्मीबाई यांच्या सारख्या शूर व चतुर पति-

व्रता, पन्ना दाई, येसूबाईसारखीं अनुकरणीय स्वार्थत्यागी स्त्रीरत्नें, सूर्याजी पिसाळासारखे "देशद्रोही व स्वामिद्रोही कुत्ते" ह्या सर्वांचा या अजिंक्य व अनादि काळानें संहार केला! केवळ जीवसृष्टीवरच वरवंटा फिरवून हे राजश्री स्वस्थ बसले नाहींत. जडसृष्टीचाहि चांगला समाचार घेतला आहे; रामावतारीं प्रसिद्ध असलेलीं किष्किंधा–मिथिलादि शहरें कोठें आहेत? शार्दूलसिंहव्याघ्रादिकांनीं गजबजलेलें तें दंडकारण्य काय झालें? महाभारतकालचीं शहरें कोठें आहेत? मिसर देशांतील विशाल मनोरे बांधणाऱ्या भाग्यशाली राजांच्या राजधान्या कोठें गेल्या? पांपी, निनवी, विजयानगर, इत्यादि इतिहासप्रसिद्ध शहरें हल्लीं नाममात्रावशेष होऊन राहिलीं आहेत हा कोणाचा प्रभाव? अनेक द्वीपें, नद्या, पर्वत वगैरे चट सारीं या कालमहाराजांच्या तावडींत गेलीं.

---

१ संभाजी महाराजांची पत्नी; प्रत्यक्ष आपल्या नवऱ्यानें आपल्या माहेरचें (शिर्क्यांच्या घराण्याचें) शिरकाण केलें असतां, तिनें शांतपणें त्यास चार गोष्टी समजावून सांगून वाटेवर आणण्याचा प्रयत्न केला. संभाजी महाराजांच्या वधानंतर मोंगल सरदार इतिकदखान रायगडावर चालून आला. त्या वेळीं गादीचा वारस शाहू ९।१० वर्षांचा होता. अशा प्रसंगीं राजारामास राज्यशकट चालविण्यास सांगून आपण आपल्या मुलासह रायगडीं राहण्याचें तिनें कबूल केलें; इतकेंच नव्हेतर आपल्या लोकांकरितां–राष्ट्राकरितां प्राणाहून प्रिय अशा पुत्रासह शत्रूच्या गोटांतील बंदीवास पत्करला! सुधारलेल्या विसाव्या शतकांतील सुशिक्षित स्त्रियांमध्यें–नव्हे बड्या बड्या पदवीधर विद्वानांमध्यें सुद्धां जो आढळणार नाही तो अद्वितीय स्वार्थत्याग अज्ञानी सतराव्या शतकांतील एका अशिक्षित अबलेनें करून दाखवावा!! अहाहा, धन्य ती साध्वी आणि धन्य तो काल कीं ज्यांत असलीं तेजस्वी रत्नें निर्माण झालीं!!!

यांच्या पुढें कोणाचीहि तिलप्राय मात्रा चालली नाहीं. परंतु उपरिनिर्दिष्ट प्रत्येक व्यक्तीचा वा पदार्थाचा आयुष्यक्रम पुढील प्रत्येक पिढीस कांहीं एक महत्वाचा उपदेश करीत आहे, हें आपण लक्षांत बाळगिलें पाहिजे. अनादिकालापासून दुर्गुणांसंबंधीं ह्मणा किंवा सद्गुणांसंबंधीं ह्मणा, जेवढ्या ह्मणून नांव घेण्यासारख्या व्यक्ति झाल्या आहेत, त्यांपैकीं निदान थोड्याशांचा जरी इतिहास आपणास कळला, तरी आपला केवढा फायदा आहे बरें ? भूतकाळाचें जें इतकें महत्व आहे, तें येवढ्याच करितां. शिवाय भूतकाळ पुन्हां परत मिळत नाहीं. पूर्व युगीं भगवान् श्रीकृष्णासारखे अवतारी पुरुष, त्याचप्रमाणें या युगीं तुकाराम, देवनाथादि साधुसंत स्वसामर्थ्यानें मृतांस जिवंत करीत. थोड्या दिवसांपूर्वीं पदार्थवाद व सुधारणादेवी यांचें माहेरघर जें लंडन शहर, त्या ठिकाणीं प्रसिद्ध थिऑसोफिस्ट मिसेस बिझांट यांनीं 'मी आपल्या मृत मित्राच्या आत्म्यास नेहमीं भेटत असतें' असें प्रतिपादिलें आहे; परंतु गेलेला क्षण परत मिळवून देणारा एक तरी प्राणी निपजला आहे काय ? किंवा पुढें तरी होण्याचा संभव आहे काय ? एकंदरींत भूतकाळाचें महत्व तीन गोष्टींवर अवलंबून आहे. एक त्याचा विस्तार, दुसरी, त्यांत उत्पन्न झालेल्या प्राण्यांचा इतिहास, आणि तिसरी त्याची अतितम दुर्मिळता.

५ एथवर भूतकाळाचा विचार झाला; आतां आपण भविष्यकाळाकडे वळूं. भूतकाळासारखीच भविष्यकाळाची व्याप्ति अतिशय मोठी आहे; भूतकाळाच्या प्रारंभाप्रमाणें भविष्यकाळाच्याहि शेवटाचा पत्ता नाहीं. भूतकाळासंबंधीं आणखी माहिती पाहिजे असें ह्मणत असतांहि, हल्लीं आपल्याजवळ त्याचा इतका मोठा इतिहास आहे कीं एखाद्या मनुष्यानें त्याचें साग्र अध्ययन करीन म्हटल्यास त्या बिचाऱ्याची हयात देखील

त्यास पुरणार नाहीं; परंतु भविष्यकाळाची माहिती मिळविण्यास राजापासून रंकापर्यंत, आणि बऱ्या विद्वानापासून तों तहत मेंढरेंराख्या धनगरापर्यंत सर्वांचे प्रयत्न चालले असतां एकास सुद्धां त्याचा सुगावा लागत नाहीं ! योगी लोक, साधुसंत, फलज्योतिषी यांस पुढें काय होणार तें कळत असेल; परंतु बाकीचा सर्व जनसमूह तरी या बाबतींत खास गाढ अज्ञानांत आहे. सर्वसाधारण चंचलता आणि गाढ अज्ञान यांखेरीज भविष्यकाळांत दुसरें कांहीं विशेषसें महत्वाचें दिसत नाहीं. तरी पण त्यासंबंधीं आपलें अज्ञान हेंच त्याच्या महत्वाचें मुख्य कारण आहे. पुढें काय होईल तें कळत नसल्यामुळें हरएक गोष्ट ताबडतोब उरकून टाकण्यासाठीं आपण किती धडपड करीत असतों, हें लक्षांत आणिल्यास ह्या विधानाची सत्यता तेव्हांच ध्यानांत येईल.

६ भूतकाळ व भविष्यकाळ यांच्या उलट वर्तमान काळाची स्थिति आहे. पहिल्या दोहोंचा विस्तार कल्पनातीत आहे, वर्तमानकाळ एका क्षणाचा आहे. भविष्यकाळरूपी एका महासागरांतून निघून भूतकाळरूपी दुसऱ्या महासागरांत हा वर्तमानकाळाचा क्षण अगदीं चोरपावलानें झटकन् जातो. भूतकालाचा शेवट आणि भविष्यकाळाचा प्रारंभ ह्मणजे वर्तमानकालचे आद्यंत होत. तो येतो केव्हां आणि जातो केव्हां याची कोणासहि गंधवार्ता नाहीं. वर्तमानकालाचा एक क्षण जातो न जातो तोंच, त्याची जागा अगदीं अपरिचित असा दुसरा एखादा पटकावतो; तो दुसराहि पहिल्याप्रमाणेंच केव्हां निघून जातो, हें कोणासहि कळत नाहीं, अशा रीतीनें हा नित्यनूतन वर्तमानकाळ चालला आहे. ड्रायडननें याचें फार सुंदर वर्णन केलें आहे; तो ह्मणतो–

And[1] as the mountains still supply their store,
The wave behind impels the wave before ;
Thus in successive course the moments run,
And urge their predecessor minutes on,
Still moving ; ever new.

---

१ आणि या जलप्रवाहांना पर्वताकडून नेहमीं पुरवठा होत असल्यामुळें, ज्याप्रमाणें त्यांची मागील लाट पुढील लाटेस पुढें लोटीत असते, त्याचप्रमाणें क्षण सतत एकापाठीं एक पळत असतात व आपल्या मागील क्षणांना निकड लावून पुढें लोटीत असतात. ते नित्य नूतन असून निरंतर फिरत आहेत.

श्रीज्ञानेश्वर महाराजांचेही हुवेहुब असेच उद्गार आहेतः—

“जैसें वाहतें पाणी जाय वेगें । तैसेंच आणिक मिळे मागें ।
येथ असंतचि असिजे जगें । मानिजे संत ॥ १३३
कां लागोनि डोळां उघडे । तंव कोडीवरी घडे मोडे ।
नेणतया तरंग आवडे । नित्य ऐसा ॥ १३४

—ज्ञानेश्वरी अ० १५—

“वाहतें पाणी जितक्या सपाट्यानें निघून जातें, तितक्याच सपाट्यानें त्याच्या मागोमाग दुसरें येऊन मिळत असतें. तेव्हां जग हें अशाश्वतच असें मानण्यांत मात्र शाश्वत आहे. १३३ किंवा डोळा मिटून उघडीपर्यंत कोट्यावधि लाटा लयास जातात आणि नव्या उत्पन्न होतात. पण अज्ञान्याला त्या तशाच सदोदित आहेत असें वाटतें. १३४ ”

के. को. ए. कृत ‘सार्थ व सटीप ज्ञानेश्वरी’.

७ अस्तु. क्षण हा दिसण्यांत फार लहान ह्मणून आपण त्याची हयगय करितों; परंतु आपली ही चूक आहे. कारण भूत, भविष्य आणि वर्तमान असा हा त्रिविध काळ ह्या लहानग्या क्षणांचाच बनलेला आहे. एक क्षण कोणास नकळत येतो आणि जातो; तो एकदां गेला कीं पुन्हां परत येत नाहीं. त्याच्या जागीं दुसरा येतो; पण तो येत नाहीं. तो अति चंचळ व समर्थ आहे; कोणास केव्हां राजा करील; कोणास रंक करील, एकास आनंदगिरीवर नेऊन ठेवील; तर एकास शोकसागरांत ढकलील. असा हा अनेकलीलाविग्रही आहे. नेपोलिअन बोनापार्टनें ऑस्ट्रियन लोकांवर जो जंगी जय मिळविला, त्याचें कारण तो असें सांगत असे कीं, 'त्या लोकांना पांच मिनिटांचा उपयोग किती व किंमत काय याची कल्पना नव्हती तींच पांच मिनिटें मला अतिशय उपयोगीं पडलीं.' "तो क्षण किती महत्वाचा होता! अरेरे, मीं मूर्खपणानें त्यावेळीं हयगय केली; नाहीं तर आज खासा आनंदांत असतों!" असले दुःखोद्गार ऐकण्याचे किंबहुना स्वतः काढण्याचे प्रसंग आपणावर अनेकवार आले असतां आपण त्याविषयीं किती गाफिल असतों बरें? चालू किंवा पुढें येणाऱ्या क्षणाचा नीट विचारपूर्वक उपयोग करण्याचा निश्चय—नव्हे नुसता विचार तरी—कोणी करतो काय? असा विचारी पुरुष हजारांत एखादाच निघेल.

---

१ शेक्सपियरचे खालील उद्गार किती सदृश आहेत:—

To-morrow, and to-morrow, and to-morrow,
Creeps in this petty pace from day to day,
To the last syllable of recorded time;
And all our yesterdays have lighted fools,
The way to dusty death.

८ ह्या लहानशा क्षणाची जी सर्वांकडूनच उपेक्षा होत आहे, तिचीं मुख्य कारणें दोन दिसतातः एक त्याचें महत्व कोणाच्या लक्षांत येत नाहीं आणि दुसरें तो अगदीं अनायासें प्राप्त होतो; एक क्षण गेला कीं त्याचे पाठोपाठ दुसरा आलाच ह्मणून समजावें. एक दिडकी हरवली तर ज्या मनुष्यास सारखी चुटपुट लागते तोच आळसांत, झोंपेंत, किंवा निरर्थक गप्पागोष्टींत आणि व्यसनांत तासचे तास, प्रहरचे प्रहर, केव्हां रात्रीच्या रात्री फुकट दवडतो, तरी त्याबद्दल त्यास कांहीं वाटत नाहीं! "एक क्षण? अं:, त्याची ती काय काळजी घ्यावयाची?" असें ह्मणून तो त्याचा तिरस्कार करतो. परंतु क्षणाची हयगय केल्यामुळें तासच्या तास, महिनेच्या महिने कसे फुकट जातात, इकडे त्याचें लक्ष जात नाहीं. नष्ट झालेलें द्रव्य पुन्हां मिळवितां येतें; रोग्यास निरोगी करितां येतें; विस्मृत ज्ञानाचें पुनरुज्जीवन अभ्यासानें होतें; गतप्राण मनुष्यास सुद्धां एक वेळ सजीव करतां येतें; अशा प्रकारें सामर्थ्यवंत पुरुष दुष्प्राप्य वस्तु अनेक उपायांनीं मिळवूं शकतो; परंतु एकदां निघून गेलेला क्षण कोणालाहि परत आणितां येत नाहीं. तेव्हां इंग्रजी भाषेंतील 'If you take care of minutes, the hours will take care of themselves' या ह्मणीप्रमाणें या क्षणाचा आपण काळजी-पूर्वक व्यय केल्यास, अशा अनेक क्षणांनीं युक्त असा जो आपला वेळ त्याचाहि तसाच व्यय केलासें होईल.

गेलेल्या क्षणाची दुर्मिळता, चालू क्षणाचें चांचल्य, आणि पुढील क्षणाचा अपरिचितपणा, या सर्वांस आपलें अज्ञान आणि निष्काळजीपणा यांची जोड मिळाली आहे. येवढ्यावरच निभावतें तरी बरें होतें; परंतु आपल्या दुर्दैवानें वेळेच्या त्रिविधतेची बरोबरी करण्याकरितांच कीं काय

आपलें अज्ञान व हयगय यांस आपल्या जीविताच्या विद्युचांचल्याचीहि भर पडली आहे; याकरितां आपणास फार सावधगिरी ठेविली पाहिजे.

९ जीवित म्हणजे अनादि, अनंत आणि अगम्य अशा कालांतील प्राण्याच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत जो वेळ तो. अर्थात् वेळेचे वर वर्णिलेले तीन गुण—गेलेल्याची अलभ्यता, चालूचा चंचलपणा, आणि पुढें येणाऱ्याविषयीं अज्ञान, हे या जीविताचे ठायीं आले आहेत. स्कॉच कवि बर्न्स म्हणतोः—

"[1] Life is but a day at most,
Sprung from night and in darkness lost,
Hope not sunshine every hour;
Fear not clouds will always lower."

मानवी जीविताचें किती यथायोग्य वर्णन हें! आपले जुने कवि आणि साधुसंत यांच्या ग्रंथांत तर असलीं वर्णनें पदोपदीं आढळतातः—

[2] तडित्सु शरदभ्रेषु गंधर्वनगरेषु च ।
स्थैर्यं येन विनिर्णीतं स विश्वसितु विग्रहे ॥

योगवासिष्ठ.

---

१ जीवित ह्मणजे फार तर रात्रींतून उत्पन्न झालेला आणि काळोखांत गडप होऊन बसलेला असा एक दिवस. तेव्हां प्रत्येक तासाला सूर्यप्रकाश मिळेल अशी आशा धरूं नका. त्याचप्रमाणें नेहमीं अभ्रांचें काहूर उठेल अशी भीति बाळगूं नका.

२ विद्युल्लता, शरदृतूंतील अभ्रें आणि गंधर्वनगरें यांच्या ठायीं ज्यानें स्थिरता मानिली, त्यानें पाहिजेतर संसाराचे ठायीं स्थैर्य मानावें.

यदिदं दृश्यते सर्वं राज्यं देहादिकं च यत् ।
यदि सत्यं भवेत्तत्र आयासः सफलश्च ते ॥ १ ॥
भोगा मेघवितानस्थविद्युल्लेखेव चंचलाः ।
आयुरप्यग्निसंतप्तलोहस्थजलबिंदुवत् ॥ २ ॥
संसृतिः स्वप्नसदृशी सदा रोगादिसंकुला ।
गंधर्वनगरप्रख्या मूढस्तामनुवर्तते ॥ ३ ॥

—रामायण.

तनका नहीं भरोंसा बे! देखे कालतमासा बे! ॥ १ ॥
येतों दो दिनकी जिनगानी । मत करना मगरोरी ॥ २ ॥
तुटेगी आखबत्की जब दोरी । पलख नहीं सबुरी ॥ ३ ॥

—कबीर.

विश्व हें लटिकें मूढा मृगजळवत् ।—मुक्तेश्वर.
क्षणभंगुर हा येथील पसारा ।
आलीया आकारा अवघें नासे ॥—तुकाराम.
काळ जातो क्षण क्षणा । मूळ येईल मरणा ॥ १ ॥
देह आहे जाई जणें । भुललासी कवण्या गुणें ॥ २ ॥
सत्य वाटतें सकळ । परि हें जातां नाहीं वेळ ॥ ३ ॥

—रामदास.

---

१ राज्य, घरदार आदिकरून हा सर्व दृश्य पसारा जर खरा असेल तर त्याविषयींचे सर्व श्रम सफल होतील ॥ १ ॥ मेघरूपी चांदव्यावरील विद्युल्लेखेप्रमाणें सर्व भोग अगदीं चंचल आहेत; तप्तलोहावरील जलबिंदूप्रमाणें हें आयुष्य क्षणिक आहे. ॥ २ ॥ स्वप्नाप्रमाणें भासमान, नेहमीं रोगांनीं युक्त, आणि 'गंधर्वनगर' अशी ज्याला अन्य संज्ञा आहे, त्या संसारांत फक्त मूर्ख मनुष्यच पडतो. ॥ ३ ॥

दिसे क्षणिक सर्व हें भरंवसा घडीचा कसें ।
धरील मन आधिनें बहु परिभ्रमे चाकसें ॥ —मोरोपंत.
वयोधनाची किति चंचळ गति? कां धरिशी भरंवसा ।?
—रामजोशी.

असे पुष्कळ उतारे देतां येतील. परंतु स्थलसंकोचास्तव एवढ्यावरच तृप्ति मानणें भाग आहे. वरील उक्तींची यथार्थता प्रत्येक विचारी मनुष्यास नेहमीं कळून येते. ज्या मुलाच्या बाललीलेकडे पाहून मातापितरें कोड-कौतुक करित असतात, ज्याचें सुंदर गोजिरवाणें मुख त्यांच्या आनंदाचें वसतिस्थान होय, ज्यावर तीं आपल्या भावी सुखाचें मनोराज्य उभारीत असतात, तें त्यांचें लाडकें—तो त्यांचा आशावृक्ष—एखादे दिवशीं ध्यानीं मनीं नसतां उन्मळून पडतो! आज आपण ज्या मित्राबरोबर गुज गोष्टी करित असतों, आपल्या कल्पनातरंगांप्रमाणें ज्याच्या जवळ उद्यांच्या परिस्थितीचें—सुखदुःखाचें—चित्र काढीत असतों, तोच उदईक मृत्यूच्या जबड्यांत पडून आपणास शोकसमुद्रांत लोटील अशी कल्पना तरी मनांत येते काय? एखादा तरुण व्यापारी "मी आज अमुक जहाज खरेदी करितों, त्या तमक्याला पुरा तोंडघशीं पाडतों." असें आज म्हणतो; परंतु दुसरे दिवशीं पाहावें तों, त्या तरुणाच्या मृत्यूमुळें त्याचें कुटुंब दुःखनिमग्न झालेलें दृष्टीस पडतें! हिंदुस्थानांत प्लेगोबानें ही गोष्ट पूर्ण निदर्शनास आणली आहे. गुदस्तांच्या धरणीकंपाचें उदाहरण घ्या. तारीख तीन एप्रील, सन १९०५ रोजीं उद्यां आपल्यावर भूमातेचा असा भयंकर कोप होणार हें कांग्रा व्हॅलींतील त्या गरीब कामकऱ्यांच्या स्वप्नीं तरी होतें का? कोणी ध्वजारोपणाच्या तयारींत गुंतला

१ या विषयाला अनुरूप असे कांहीं उतारे शेवटीं परिशिष्टांत दिले आहेत.

असेल, तर कोणाच्या घरीं सामान आणण्याची गर्दी चालली असेल; कोणी आपल्या इष्टमित्रांना बोलावण्याच्या गडबडींत असतील; दुकानदारांनीं कधीं न खपणारा माल बाहेर काढून त्यावर अवाचे सवा नफा मिळविण्याचा सपाटा चालविला असेल: आपणांस जणों काय मार्कंडेयाचें आयुष्य प्राप्त झालें आहे अशा रीतीनें सर्वांचे खरे खोटे व्यवहार चालले होते; परंतु–हाय हाय–दुसरे दिवशीं सर्वजण यमाजीभास्कराचे दरबारीं चालते झाले !

असो; आधींच एकंदर वेळ चंचल; गेली घडी पुन्हा मिळत नाहीं; पुढें येणारीविषयीं आपण अगदीं अज्ञ आहों; आपलें जीवित पाण्यावरील बुडबुड्याप्रमाणें क्षणभंगुर आहे; यामुळें चाललेली घडी फारच महत्वाची झाली आहे; परंतु हें तिचें महत्व ओळखून स्वस्थ बसतां कामा नये; तर तिचा उपयोग करून घेतला पाहिजे.



भाग २.

जीवितकर्तव्य.

राया ! कुलार्थ पुरुष, ग्रामार्थ कुलहि समस्त सोडावें, ।
ग्रामहि देशार्थ, मही आत्मार्थ, बुधें भलेंचि जोडावें. ॥

—मोरोपंत.

वेळेच्या कोणत्या भागाचा विचार करावा ?—मनुष्याचा मुख्य उद्देश—वेळेचा दोन प्रकारें व्यय—मुख्यसत्कर्में—सर्व सत्कर्मांचें सार—आत्मोन्नति कशानें होते ?

१ वेळ किती महत्वाची, चंचल आणि बहुमोल आहे, याचें मागील भागांत विवरण झालें. आतां आपण तिचा व्यय कसा करावा याविषयीं विचार करूं. या ठिकाणीं हें सांगून ठेविलें पाहिजे कीं, वेळेचा व्यय कसा करावा यासंबंधीं विचार चालला असतां विश्वाच्या आदितत्त्वाच्या उदयापासून लयापर्यंत जो तिचा अवाढव्य विस्तार आहे, त्या सगळ्याचा विचार करण्याची जरूर नाहीं आणि तें कोणास शक्यही पण नाहीं. या छोट्याशा निबंधांत आपल्या जन्मापासून मृत्यूपर्यंत जो वेळ त्या विषयींच विचार केला ह्मणजे पुरे आहे.

२ वेळेच्या व्ययाचा विचार करण्याच्या अगोदर आपलें कर्तव्य काय, आणि आपण करित असतों काय हें पाहूं. सर्व धर्मांतील व स्थितींतील मनुष्यांचा उद्देश विचारांतीं एकच दिसतो; प्रत्येकास सुख पाहिजे सर्व

धर्मशास्त्रें लोकांस सुखाचाच मार्ग दाखवित आहेत; तरणा बांड शूर शिपाई स्वतःच्या सुखासाठींच सतीचें वायन घेऊन समरभूमीवर जाण्यास तयार होतो; सुळावरची पोळी अशी जी गादी तिचा उपभोग राजेलोक स्वसुखाकरितां घेतात; बलाढ्य राष्ट्रें लहान लहान देशांस आपल्या सुखास्तव धुळीस मिळवितात; सुखासाठींच चोर दरवडे घालितात; खुनी मनुष्य सुखाकरितांच खून करून पैसे मिळवितात; विषयवासनेनें बद्ध होऊन विश्वयोषितांच्या पाशांत उल्लू तरुण पडतात, त्यास त्यांची प्रबल सुखेच्छाच कारण होय; मद्यप्रिय लोक सुख मिळण्यासाठींच बाटलीबाईची आराधना करितात; न्यू झीलंडमधले लोक आपलें सगळें तोंड गोंदवून घेत, ते आपल्या सुखाकरितांच; योगी सुखप्राप्त्यर्थच घोर गिरिकंदरांत बसून उग्र तप करितो; सुख व्हावें ह्मणून पापीजन दुष्कर्में करितात, आणि नंतर पश्चात्ताप पावून परमेश्वरास शरण जातात ते सुखासाठींच; सुखाच्या बंदरांत उतरण्याकरितांच प्रत्येक मनुष्य या देहरूपी नौकेंत बसला आहे; आणि त्याचे प्रयत्न व त्याच्या वेळेचा व्यय त्याच दिशेनें होत आहे; परंतु सुखरूपी बंदर कोठें आहे व काय आहे हेंच आधीं कित्येकांस माहित नसतें; त्यामुळें बंदरांत नेमका जाऊन उतरणारा असा प्रवासी लाखांत एखादाच भेटतो; आणि बाकीच्यांची खटपट व अमूल्य वेळ हीं फुकट जातात. पण प्रत्येकाच्या वेळेचा उपयोग सुख मिळविण्याच्या उद्देशानें होत आहे, हें मात्र खास.

३ प्रत्येक वस्तूचा चांगल्या आणि वाईट अशा दोन्ही तऱ्हेनें उपयोग करून घेतां येतोः ज्या पाषाणाची आपल्या पूज्य व आनंददायी अशा आराध्य देवतेची मूर्ति होते, तोच प्रसंगविशेषीं एखाद्या गरिबाच्या नाशास कारण होतो. स्वसंरक्षणाच्या उपयोगीं पडणारीं तरवार, बंदुका वगैरे हत्यारें एखादे वेळीं स्वतःच्याच मृत्यूस कारण होतात. जो अग्नि

आपलें अन्न शिजवितो, ज्याच्या साहाय्यानें आगगाड्या, आगबोटी भरधांव पळत असतात, आणि ज्याच्या योगानें खंदक भरून राजेलोक स्वसैन्याचें संरक्षण करितात, तोच उपयोगी अग्नि निरपराध मनुष्याला उभा जाळतो, घरेंच्या घरें, गांवेंच्या गांवें बेचिराख करून सोडतो. आपले हात, पाय, डोळे इत्यादिकांचेंहि असेंच आहे. ज्या हातांनीं प्रामाणिकपणानें उद्योग करावयाचा, आईबापांची सेवा करावयाची, गरिबांना दानधर्म द्यावयाचा, परमेश्वराच्या श्यामसुंदर मूर्तीची पूजा करावयाची, तेच हात दुसऱ्यास त्रास देण्यांत, खून आणि डाके पाडण्यांत, देवालयांचा विध्वंस करण्यांत, अनाथ अबलांना छळण्यांत उपयोगीं पडतात; वेळेलाहि हा न्याय लागू पडतो; ह्मणजे तिचा व्यय दोन प्रकारें होतो; एक सद्व्यय आणि दुसरा दुर्व्यय किंवा अपव्यय. सद्व्यय करणें ह्मणजे आपला वेळ सत्क्रिया करण्यांत घालविणें, आणि अपव्यय करणें ह्मणजे दुष्कर्में करण्यांत वेळ घालविणें किंवा कांहीं न करितां स्वस्थ बसणें.

४ "सत्कर्मयोगें वय घाल"विल्यानें त्याचा सद्व्यय केलासें होतें. सत्कर्माचे अनेक पोटभेद आहेत: दीन दुबळ्यांचा परामर्ष घेणें; आजाऱ्यांची शुश्रूषा करणें, स्वतः नीतीनें वागून दुसऱ्यांस तसें वागण्यास शिकविणें, सज्जनांच्या संरक्षणाकरितां खलांस शासन करणें, मातापितरांची सेवा करणें, सदोदित उद्यमरत असणें, नानाविध शास्त्रांचा, कलांचा अभ्यास करणें, नवीन नवीन उपयुक्त शोध लावणें, कृष्णदयार्णवाप्रमाणें स्वतः कष्ट सोसून आपल्या बांधवांच्या हितास्तव मोठमोठे सद्ग्रंथ रचणें, निराकार निर्गुण सच्चिदानंदास भक्तीच्या जोरावर आपलासा करणें, थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे श्रीसमर्थांप्रमाणें स्वतःची आत्मिक उन्नति साधून समाजोन्नति आणि राष्ट्रोन्नति करण्यांत आपलें सर्वस्व खर्चणें हेंच

सर्व सत्कर्मांचें सार होय; आणि यांतच आपल्या वेळेचा व्यय करणें, यापरता तिचा सद्व्यय करण्यास दुसरा श्रेष्ठ मार्ग तो कोणता? परंतु साधारण मनुष्यास समर्थांची योग्यता येत नाहीं. त्यांनीं आत्मोन्नति, समाजोन्नति आणि राष्ट्रोन्नति या तिन्ही गोष्टी केल्या; साधारण मनुष्यास तिहींपैकीं एकच साधण्याची मारामार; मग तिहींची गोष्ट लांब राहिली. ह्या त्रयींत आपणास अवश्य कोणती पाहिजे, आधीं कोणती करावयाची, याविषयीं आपण आतां विचार करूं. हा विचार न झाला तर 'एक धडना भाराभर चिंध्या' अशापैकीं स्थिति होऊन तिन्हींपैकीं एकही न साधतां आपलें आयुष्य मात्र फुकट जाईल.

५ आत्मोन्नति, समाजोन्नति आणि राष्ट्रोन्नति या तिहींत पहिली फारच जरूरीची आहे; तिजकडे आपण प्रथम लक्ष दिलें पाहिजे. समाज आणि राष्ट्र हीं व्यक्तींवर अवलंबून असतात; अनेक व्यक्तींचा समाज बनतो आणि अनेक समाजांचें राष्ट्र होतें. उन्नत दशेस प्राप्त झालेल्या व्यक्ति समाजांत जितक्या जास्त, तितकी समाजोन्नति अधिक सुकर. असे अनेक समाज उन्नतीप्रत पावले ह्मणजे राष्ट्रोन्नति होण्यास कांहींच वेळ लागत नाहीं. ज्या मनुष्याची आत्मिक उन्नति झाली नाहीं तो समाज आणि राष्ट्र यांची सुधारणा करण्यास पुढें सरसावला, तर ती करणार तरी कशी ? एखादा प्रसिद्ध अट्टल भामट्या जर, 'दुसऱ्याची वस्तु कोणीं चोरूं नये, सदोदित खरें बोलत असावें' असा उपदेश करूं लागला, तर त्याच्या उपदेशाचा कांहीं तरी परिणाम होईल का ? किंवा ज्यास कवित्व आणि रसिकता ह्मणजे काय हें ठाऊक नाहीं असे एखादे 'ज्ञानलवदुर्विदग्ध' राजश्री 'कालिदासाचें कवित्व' किंवा 'तुकाराम आणि मोरोपंत यांची तुलना' यासारख्या विषयावर व्याख्यान देण्यास उभे राहिले, तर तें कितपत योग्य होईल बरें ? किंवा चोर धरण्याकरितां बायकोच्या

हातीं कांकडा देऊन तिला पुढें करणारे, आणि खरबुजाच्या मारासरशीं धोतर भरविणारे झुंझारराव शिलेदार जर तालिकोट, पानिपत, किंवा रुसोजपानी युद्धांतला मुकडेनचा घनघोर रणसंग्राम यावर वक्तृत्व गाजवूं लागले तर तें किती उपहासास्पद आहे बरें ? तितकीच किंबहुना त्याहूनहि जास्त लज्जास्पद स्थिति, स्वतः नीच असून जो 'परोपदेशे पांडित्य' करतो त्याची आहे. असा मनुष्य आपलें स्वतःचें वय फुकट घालवून, अंधपरंपरेनें जे त्याचे अनुयायी झालेले असतात, त्यांसहि खाड्यांत पाडतो. याच्या उलट स्थितींत असलेल्या मनुष्याकडे पहा; तो आत्महित साधण्यांत अगदीं गुंग होऊन गेलेला असतो; कोणी बरें वाईट ह्मणेल याची त्यास चाड नसते; तरी पण कांहीं नीच मनोवृत्तींच्या माणसांखेरीज बहुतेक सर्वलोक, तो त्यांस धुडकावून लावित असला तरी जातात, आणि त्याच्या उपदेशाप्रमाणें वागून आपली उन्नति करून घेतात; याकरितां राष्ट्रोन्नति आणि समाजोन्नति यांची केवळ आईच अशी जी आत्मोन्नति ती साधणें हेंच आपलें आद्य कर्तव्य आहे, आणि यांतच आपल्या आयुष्याचा व्यय झाला पाहिजे.

६ आत्मोन्नति इतकी महत्वाची असतां बहुतेक लोकांचें तिजकडे फारसें लक्ष जात नाहीं. जो उठतो तो दुसऱ्याच्या डोळ्यांतील कुसळ काढावयास धांवतो; स्वतःच्या डोळ्यांतील मुसळ कोणासच दिसत नाहीं. संपत्ति, मान, सन्मान, कीर्ति इकडेच सर्वांचा ओढा असतो. ज्याला त्याला वाटतें कीं, 'मी कायतो शहाणा, मी विद्वान्, मी सांगेन तसें सर्वांनीं वागावें; लोकांनीं मला आपला पुढारी करावें'. परंतु आंगीं योग्यता नसतां कोरड्या मनोराज्यानें ही इच्छा फलद्रूप व्हावी कशी ? हे गृहस्थ 'मद्यपान कोणीं करूं नये,' असें व्याख्यान देतांना लोकांस सांगतात, आणि मद्यपानाचा पूर्ण निषेध करितात; परंतु त्यांना स्वतः मात्र घरीं गेल्याबरोबर तोंडास

बाटली लावल्याशिवाय चैन पडावयाचें नाहीं. दारू पिऊन रंगभूमीवर तुकारामाची भूमिका करणाऱ्या नटाप्रमाणें यांची स्थिति असते. कित्येकजण "Money brings honour, friends, conquest and realms." (सर्वे गुणाः कांचनमाश्रयन्ते) या सैतानी तत्वाला बळी पडतात. कांहीं लोकांना वाटत असतें कीं, आपण पुष्कळ पुस्तकें वाचलीं, अनेकशास्त्रपारंगत झालों, ह्मणजे आपली आत्मोन्नति होते. परंतु ही चूक आहे. पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचा जनक जो लॉर्ड बेकन त्याचे ग्रंथ पाहिले असतां असें वाटतें कीं याच्यासारखा ज्ञाता पुरुष दुसरा कोणी झाला नसेल. परंतु त्याचें वर्तन किती गर्ह्य होतें हें सर्व इतिहासज्ञांस माहित आहेच. तेव्हां नुसत्या संपत्तीनें किंवा पुस्तकी विद्वत्तेनें आत्मोन्नति होत नसते. ती होण्यास मिल्टननें ह्मटल्याप्रमाणें [१]मनाचें आणि तज्जन्य विकारांचें आकलन करून स्वतः सद्गुणी बनलें पाहिजे.

सत्कर्म करण्यांत वेळ घालविल्यानें तिचा सद्व्यय होतो, सर्व सत्कर्मांत आत्मोन्नति मुख्य आहे,. आणि आत्मोन्नति साधण्यास आपल्या आंगीं सद्गुण पाहिजेत, व आपलें आचरण पवित्र पाहिजे. याकरितां ज्यांस स्वतःचें किंवा इतर लोकांचें हित साधण्यांत कालक्षेप करणें असेल, त्यांनीं आपले वाईट मनोविकार नाहींसे करून स्वतः सद्गुणी, सद्वर्तनी आणि उद्योगशील बनण्याचा प्रयत्न करावा.

---

१ He who reigns within himself, and rules
Passions, desires and fears, is more a king,
Which every wise and virtuous man attains.
—Paradise Regained, Book II.



भाग ३.

दुर्वर्तनी लोकांचे वेळ घालविण्याचे मार्ग.

व्याघ्रीपरी भय करीत उभी जरा, रे!।
देहास रोग करिती रिपुतुल्य मारे, ॥
आयुष्य भिन्नघटनीर सरे तसें हें,।
पापें तथापि जन आचरितात पाहें. ॥ १ ॥

—वामनपंडित.

आयुष्यांतील रिकामा वेळ—आळस—दुष्कर्मी लोकांचे तीन वर्ग—लोभी—कृपण—महत्वाकांक्षी—विषयी—तमाशे व नाटकें—गप्पा—वाईट पुस्तकांचें वाचन—पोटभरू लोक—पोषाक—सारांश.

१ प्रख्यात आंग्ल निबंधकार ॲडिसन यानें एके ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं, जर आपण सर्व साधारण लोकांच्या आयुष्यक्रमाचे वीस भाग केले, तर त्यांत एकोणीस भाग अगदीं मोकळे, कीं ज्यांत कांहीं एक उपयुक्त कार्य झालें नाहीं, असे निघतील; आणि हें त्याचें ह्मणणें बरोबर आहे. मानवी जीविताची सर्व साधारण इयत्ता शंभर वर्षांची आहे. बऱ्याच लोकांना रोजीं दहा तास झोंप लागते; त्या मानानें आयुष्याचा पांच बारांश भाग निद्रेंत जातो. बालपण आणि वृद्धत्व यांत वीस वर्षें जातात. खाणेंपिणें यास आठ वर्षें धरूं. शिवाय नेहमींचीं

दुखणींबाहणीं आहेतच. आळसांत आणि चकाट्या पिटण्यांत किती वेळ जातो याची तर गणतीच नाहीं. अशा रीतीनें चौऱ्यांयशीं लक्ष योनि हिंडून मिळविलेली ही मानवी तनु आणि हें बहुमोल आयुष्य यांचा अपव्यय होतो. हा जो लोकांचा आयुष्य घालविण्याचा क्रम सांगितला यांत आपणांस किती वर्षें सदुद्योगाकरितां काढतां येतील तें पाहूं. मनुष्याला सहा तास झोंप पुरे आहे, असें वैद्यशास्त्र ह्मणतें; परंतु आपण आणखी एक तास घेऊं ह्मणजे झोंपेला सात तास देऊं. या रीतीनें रोजचे तीन तास व शंभर वर्षांतील बारा वर्षें मिळालीं. निद्रादेवीस अर्पण झालेले हे तीन तास जर एखादा सद्ग्रंथ वाचून त्याचें मनन करण्यांत किंवा दुसरें कांहीं सत्कर्म करण्यांत गेले तर तें किती कल्याणकर आहे बरें ! दहातास झोंपेच्या योगानें रोजीं केवळ तीनच तास फुकट जातात असें नाहीं; तर त्यांच्याबरोबर जास्त झोंप घेतल्यामुळें आंगांत शैथिल्य शिरून दुसरा वेळहि फुकट जातो. पुष्कळ झोंप घेतल्यामुळें आयुष्यहि कमी होतें. रोज रात्रीं दहा वाजतां निजून पहांटे पांच वाजतां उठावें असा चाळीस वर्षें क्रम ठेविल्यास तें दहा वर्षें आयुष्य वाढल्याप्रमाणें आहे. असें डॉड्रिजचें मत आहे. फ्रेंच ग्रंथकार बफन याची गोष्ट बहुतेकांस ठाऊक असेलच. आपल्या चाकराच्या मदतीनें सकाळीं सहा वाजतां उठून सोळा वर्षांत सृष्टिशास्त्रावर त्यानें पस्तीस भागांचा एक प्रचंड ग्रंथ लिहिला ! दुखणींबहाणीं हीं कोणाच्या हातचीं नाहींत; तरी पण नियमितपणानें व सावधगिरीनें वागल्यास आणि शरीरप्रकृतीची चांगली काळजी घेतल्यास त्यांतून देखील आपणांस पुष्कळ वेळ मिळेल. गुरुत्वाकर्षणाची उपपत्ति प्रस्थापित करणारा न्यूटन जन्मतःच इतका अशक्त आणि रोगी होता कीं, तो जगेल असें खुद्द त्याच्या आईसहि वाटेना; परंतु निय-

मितपणा आणि शरीराची चांगली निगा यायोगें तो जगला इतकेंच नव्हे; तर पुढें चांगला धट्टाकट्टा होऊन मरेपर्यंत त्यास रोग ह्मणून झाला नाहीं. त्याचा जबरदस्त व्यासंग सर्वश्रुत आहेच. शैशवावस्था अज्ञानमय असते तरी त्या वयांत मुलें पुढें सुशील आणि नीतिमान् निपजतील अशा रीतीचें आचरण ठेवण्यास शिकवून त्याचा उपयोग करून घेतां येईल. पंडित [1]श्री गट्टुलालजी किंवा जेम्स [2]फर्ग्यूसन यांसारख्या अलौकिक बुद्धीच्या आणि उमेदीच्या पुरुषांखेरीज बहुतेक सर्वजण या वयांत परावलंबी असतात; त्यामुळें यासंबंधीं कांहीं जास्त लिहितां येत नाहीं. तसेंच आळसांत आणि गोष्टीश्राद्धें झोडण्यांत जो वेळ जातो त्याचाहि आपण योग्य उपयोग करून घेतला पाहिजे.

---

१. हे पांचव्या वर्षापासून दोन्ही डोळ्यांनीं अगदीं अंध असून ह्यांनीं अनेक श्रुतिस्मृतिपुराणादिग्रंथ अगदीं मुखोद्गत करून टाकले.

२. जेम्स फर्ग्यूसन, १७१६–१७७६. हा एका मजूरदाराचा मुलगा; बाप वडील मुलांस शिकवित असतां, यानें जवळ बसून ऐकावें व नंतर एकांतांत जाऊन सर्व पाठ करावें; अशा रीतीनें बापाला नकळत स्वारी वाचावयाला शिकली! मेंढ्या राखावयास ठेविलें असतां त्यानें दिवसाचा फुरसतीचा वेळ चक्क्या वगैरेंचे नमुने करण्यांत घालवावा, आणि रात्रीं एक दोरा घेऊन ताऱ्यांचीं भासमान अंतरें मोजीत बसावें. पुढें मोठा झाल्यावर सुद्धां त्याचा हा व्यासंग कायम राहिला. एके वेळीं त्याला कामावरून घरीं बसावें लागलें; तशांतच त्याच्या हाताला कांहीं इजा होऊन तो अगदीं अशक्त झाला; अशा स्थितींत सुद्धां त्याला स्वस्थ बसवेना. पूर्वीं त्यानें एक घड्याळ पाहिलें होतें, त्याबरहुकूम त्यानें एक लांकडाचें घड्याळ तयार केलें! असे उद्योगी, विद्याव्यसनी आणि वेळेची किंमत जाणणारे लोक ज्या देशांत निपजतात त्याची भरभराट कां होणार नाहीं?

२ वेळेचा दुर्व्यय आळसानें किंवा निरुद्योगीपणानें जितका होतो, तितका दुसऱ्या कशानेंहि होत नाहीं. आळस हा व्यक्ती, समाज आणि राष्ट्र या सगळ्यांचा शत्रु आहे. हा जें नुकसान करील, तें प्रत्यक्ष हाडवैऱ्याच्या हातूनहि होणें नाहीं. वैरी फार झालें तर अपमान करील, व्यापारांत ठोकर बसवील, त्याच्या हातीं लागल्यास हालहाल करील, किंवा ठार मारून आयुष्याचा शेवट करून टाकील; परतु आपली विद्या, सद्गुण व उद्योगशीलता हीं आणि यांपासून मिळालेलें सुयश तो नाहींसें करूं शकणार नाहीं; आणि आळस जीं आपल्या कीर्तीचें बीज, आयुष्याचें सार, ज्यांच्या योगानें आपली उन्नति होणार, तीं सद्विद्या, सद्गुण, आणि उद्योगशीलता लुप्तप्राय करून हा दुर्लभ मानवजन्म निरर्थक करितो. आळस हा दुर्विचारांची खाण, दुर्व्यसनांची माता व अनेक रोगांचें माहेरघर होय. राष्ट्रीय आपत्तीचा मूळ उत्पादक आळस होय. आळस हा एक महानद आहे. त्याचा प्रवाह वरवर पाहणाऱ्या सामान्य जनांस फार शांत दिसतो; परंतु तो प्रत्येक क्षणीं सद्गुणाच्या भव्य तटाचा पाया ढांसळीत आहे. कवडीचुंबकास आपल्या चुलीखालील ठेवीचा जितका उपयोग, तितकाच आळशी मनुष्याला आपल्या शारीरिक आणि मानसिक शक्तींचा उपयोग. या आळसानें कितीकांच्या सुखांत माती कालविली, कित्येकांची विद्या बुडविली, आणि कांहीं जणांचें जिणें व्यर्थ केलें. व्यक्ति, समाज आणि राष्ट्र यांच्या आयुष्याचा या राक्षसानें फन्ना उडविला ! रोमला एके काळीं थरथर कांपविणारे पोल्स लोक आळसामुळेंच आज विपन्नावस्थेंत कुजंत पडले आहेत ! आळसामुळेंच हिंदुस्थानला आज हीन दशा आली आहे ! मनुष्यमात्राच्या सर्व शत्रूंत वेळ आणि आळस यांसारखे बलाढ्य वैरी दुसरे कोणी नाहींत. ह्या ठिकाणीं वेळेला मनुष्याचा शत्रु म्हटलेलें पाहून कित्येकांस आश्चर्य वाटेल परंतु

विचारपूर्वक पाहतां आळसाइतकाच वेळहि मनुष्याचा शत्रु आहे. आळस आयुष्य असून नसून सारखेंच करितो; वेळ पळापळानें आपलें आयुष्य तोडित असतो. सर्वभक्षक वेळाच्या तोंडांत गेलेलें आयुष्य आणि आळसांत गेलेलें आयुष्य परत मिळविणें हें वालुकाकणांचें तेल काढण्याप्रमाणेंच दुष्कर आहे. मनुष्यजातीचे सदुद्योगी, दुष्कर्मी आणि निरुद्योगी किंवा आळशी असे जे तीन भाग पडतात, त्यांत आळशी अगदींच अधम होत. ते केवळ खायाला काळ आणि भुईला भार. सगळ्या दुर्गुणांत आळस आंगांत लवकर चढतो; आणि सुरवातीसच त्याचा बींमोड करण्याची काळजी घेतली नाहीं, तर तो आंगीं इतका मुरून बसतो कीं, मोठ्या निश्चयी व धीराच्या मनुष्याला देखील त्यास घालविण्याची मुष्कील पडते. सुखाच्या मागें लागूनच मनुष्य आळशी बनतो; परंतु आळसांत वास्तविक सुख नसतें. कारण आळशी मनुष्यास उद्योग वैऱ्यासारखा भासतो; आणि कोणासहि उद्योगाशिवाय तर सुख मिळणें नाहीं. कांहीं लक्ष्मीपुत्रांस पोटाकरितां काम करण्याची जरूर नसते; परंतु हातपाय न हालवितां अगदींच स्वस्थ बसूं ह्मटल्यास त्यांचेंहि चालावयाचें नाहीं. सुखप्राप्त्यर्थ त्यांस कांहींतरी उद्योग केलाच पाहिजे. सुस्तीमुळेंच मनुष्याला कामाची चालढकल करण्याची संवय लागते. आळशी मनुष्याला जिवंत असतांनाहि दुःख आणि मरणानंतर आयुष्याचा दुरुपयोग केल्यामुळें यमयातना सोसाव्या लागतात. एवढ्याकरितांच समर्थांनीं उपदेश केला आहे कीं,

आळस उदास नागवणा। आळस प्रेत्नबुडवणा।
आळसें करंटपणाच्या खुणा। प्रगट होती॥ १२॥
ह्मणौन आळस नसावा। तरीच पाविजे वैभवा।
अत्रीं परत्रीं जीवा। समाधान॥ १३॥

—दासबोध. द. ११. स. ३.

३ निरुद्योग्यांप्रमाणें दुष्कर्मी लोकही वेळेचा दुरुपयोगच करितात. फरक इतकाच कीं, आळशांचा वेळ अगदींच फुकट जातो, आणि हे तितक्यांत कांहीं तरी उद्योग करितात. परंतु या त्यांच्या कालक्रमणास चांगलें ह्मणतां येणार नाहीं. कुमार्गगामी जनांचे असंख्य भेद आहेत. परंतु त्यांचे मुख्य वर्ग तीन पडतात; लोभी, महत्वाकांक्षी आणि विषयी. या तीन वर्गांचा आणि दुसऱ्या कांहीं मुख्य मुख्य वेळेचा दुर्व्यय करणाऱ्या मार्गांचा आतां विचार करूं.

४ "सामान्य लोकांचे व्यापारधंदे, नोकऱ्याचाकऱ्या वगैरे करण्यांत मुख्य हेतु दोन असतात: एक विलासतृष्णा, आणि दुसरा पोटोबाची खळगी भरणें. यांपैकीं विलासतृष्णा जेव्हां अतिशय वाढते, तेव्हां तिला विषयासक्ति हें नांव प्राप्त होतें; आणि मध्याह्नकाळची काळजी जेव्हां फाजील अधिक होते, तेव्हां तिला लोभ असें ह्मणतात"[१]. विषयासक्तीचें वर्णन पुढें येणारच आहे. प्रस्तुत लोभासंबंधीं विचार करावयाचा आहे. "लोभमूलानि पापानि ।" असें जें संस्कृतवचन आहे, तें अक्षरशः खरें आहे. कोणतेंहि पातक घ्या, त्यांत लोभाचा अंश थोडा तरी सांपडतोच; मग तें पातक व्यक्तीचें असो, समाजाचें असो, अथवा राष्ट्राचें असो; चोर चोरी करितात ती लोभामुळें; या लोभानेंच गिझनीच्या महमुदास अनन्वित कृत्यें करावयास लावलें. अलेक्झँडर दि ग्रेट् हा लोभालाच बळी पडला; २८०००००० (दोन कोट ऐंशी लक्ष)[२] आफ्रिकन नीग्रो लोकांची नैसर्गिक स्वतंत्रता हिरावून घेऊन, जन्मभूमि, आप्तइष्ट यांपासून त्यांची ताटातूट करून, त्यांस गुलाम ह्मणून जें ख्रिश्चिअन व्यापाऱ्यांनीं विकलें त्यास कारण लोभच होय; जगांतील बहुतेक युद्धांचें कारण लोभ-

---

१ ॲडिसन. २ Todd's Students' manual.

च आहे; पोपांसारख्या सर्वसंगपरित्यक्त मठवाशांसहि त्यानें सोडिलें नाहीं. याचीं लक्षणें ज्ञानेश्वर महाराजांनीं पुढीलप्रमाणें दिलीं आहेत. "परदारादिक पडे । परि विरुद्ध ऐसें नावडे । मग शेळियेचेनि तोंडें । सैंघ चारी ॥ १ ॥ हा ठायवरी लोभ । करी स्वैरत्वाचा राब । वेटाळितां अलाभ । तें तें उरे ॥ २ ॥ "—याचा अर्थ असा कीं, परदारादिकांशीं प्रसंग पडला तरी विरुद्ध असें त्यांत कांहीं वाटतच नाहीं; शेळीच्या तोंडाप्रमाणें (चवीकडे लक्ष न देतां) भराभर चरूं लागतो. लोभ हा इतकें स्वेच्छाचाराचें वर्तन करितो कीं, त्याच्या हातांत जेवढें पडत नाहीं तेवढेंच शिल्लक राहतें. या लोभानें तेजस्वी पुरुषांना सुद्धां नागवून निष्प्रभ करून सोडलें आहे. लोभाचा वरचष्मा ज्याच्या हृदयांत आहे तो सर्व सुखास मुकला ह्मणून समजावें. कारण लोभ्याची स्थिति अशी असते कीं, त्याला एखादी इच्छित वस्तु प्राप्त होईपर्यंत तिचा एकसारखा हव्यास लागलेला असतो. ती एकदां मिळाली ह्मणजे तिच्या विषयींची त्याची आदरबुद्धि कमी होत जाते. आणि नंतर दुसरी एखादी त्याच्या मनांत भरते; ती प्राप्त झाली ह्मणजे तिचीहि पहिलीप्रमाणेंच स्थिति होते; अशा रीतीनें लोभ्याचें हें रहाटगाडगें चालतें. लोभी मनुष्य मोक्ष मिळवूं इच्छिणाऱ्या साधकापेक्षांहि जास्त श्रम करित असतो; पण त्या श्रमांचा काय उपयोग? लोभातिशयामुळें त्याच्या अंतःकरणांतील उदात्तविचारपुष्पांची सुंदर मालिका करपून जाते. पैसाच त्याचा धनी होऊन बसतो, त्याला आईबाप, भाऊ बहीण, बायकापोरें वगैरे सर्व पैशापुढें तुच्छ वाटतात. पैशाकरितां त्यांस प्राणसंकटें आलीं तरी बेहेत्तर! लोभी मनुष्याला द्रव्यासाठीं होणारे कष्ट, दुःख, काळजी, पश्चात्ताप, आणि तत्प्राप्त्यर्थ त्याचा जाणारा वेळ यांचा जर त्यानें जीवितसाफल्य करण्याकडे उपयोग केला तर किती मजा होईल बरें!

५ लोभापासून कार्पण्य आणि महत्वाकांक्षा या दोन मनोविकारांचा उद्भव आहे. मिळालेल्या वस्तूंचा कसल्याहि प्रसंगीं व्यय न करण्याची इच्छा इचें नांव कार्पण्य. आणि महत्वाकांक्षा हें लोभाचें रूपांतर होय. कृपण मनुष्य नेहमीं पैशासाठीं झुरत असतो. एक दिडकी हरवली तर ती शोधून काढण्यासाठीं तो भर दोनप्रहरचा देखील दोन तीन कोस जाऊन येईल. गुप्त स्थलीं थैल्या सोडून त्यांतील पैसे हळुहळु मोजित बसणें आणि नव्याण्णवचे शंभर, शंभरांचे सवाशें केव्हां होतील ह्या विवंचनेंत काळ घालविणें, हाच त्याचा आनंद; कसलेंहि आनंददायी काव्य असो, रमणीय पुष्प असो, सुंदर चित्र असो, तुमचें तिकडे कांहीं असो, या द्रव्यदासाला धनसंचयाच्या गोष्टींखेरीज दुसऱ्या कशाचीहि गोडी नाहीं. कद्रु मनुष्य द्रव्य मिळवितो हें ह्मणणें चुकीचें दिसतें; खरोखर पाहतां द्रव्यच त्याचें अंतःकरण मिळवित असतें. पैशासाठीं तो वाटेल त्या मार्गाचा अवलंब करितो. केवळ धनसंचयांतच आयुष्य घालविण्याकरितां सन्मार्ग सोडणें यापेक्षां दुसरा मूर्खपणा तो कोणता?

६ महत्वाकांक्षा ह्मणजे मोठेपणाची अनावर इच्छा, आणि लोभ ह्मणजे द्रव्यादिकांची हांव. महत्वाकांक्षी मनुष्याचें सगळें आयुष्य 'एष वंध्यासुतो याति खपुष्पकृतशेखरः । मृगतृष्णांभसि स्नातः शशशृंगधनुर्धरः ।' या श्लोकांतील वंध्यासुतासारख्या मिथ्यावस्तूंच्या प्राप्तीस्तव व्यर्थ जातें. 'मला यांत सन्मान मिळून माझा नांवलौकिक व्हावा' अशी इच्छा धरूनच तो कोणतेंहि कार्य हातीं घेतो. कीर्तीच्या आशेवर जरी कांहीं उपयुक्त कार्यें घडलीं आहेत तरी एकंदरींत तिनें पुष्कळांचें नुकसानच केलें आहे. वास्तविक पाहूं जातां जगांत असे किती लोक आहेत बरें, कीं ज्यांचें कर्तृत्व, बुद्धिवैभव पाहून सर्वांनींच माना डोलवाव्या? तसेंच स्वतःच्या उद्योगशीलतेच्या आणि बुद्धिमत्तेच्या जोरावर पुढें

आलेल्या लोकांपैकीं असे कितीजण आहेत कीं ज्यांच्या सद्गुणांवर अगर सत्कृत्यांवर जनतेचें अज्ञान, मत्सर व अविचार यांपैकीं एकाचाहि परिणाम झाला नाहीं? कांहीं लोकांना सत्कृत्य आणि दुष्कृत्य यांतील भेदच समजत नाहीं; दुसऱ्या कांहींची अशी ठाम समजूत असते कीं, कोणतेंहि कार्य घेतलें तरी त्यांत तें करणाराचा कांहीं तरी स्वार्थपर हेतु असतोच; आणि कांहींजण मुद्दामच चांगल्या कृत्यावर दोषारोप करीत असतात. खरा गुणज्ञ विरळाच सांपडतो. मिल्टन ह्मणतोः—[1]

They praise, they admire, they know not what,
And know not whom, but as one leads the other.

ज्यांच्यापासून शाबासकी मिळविण्याची महत्वाकांक्षी मनुष्याला इच्छा असते त्यांची ही स्थिति. आतां खुद्द त्याजकडेच वळूं. तो तर कीर्तीसाठीं अगदीं हपापलेला असतो; आपलें पाऊल वाईट मार्गांत आहे कीं चांगल्या मार्गांत आहे इकडे त्याचें लक्ष नसतें. वाटेल ते उपाय योजावे लागले तरी हरकत नाहीं, पण थोडासा तरी नांवलौकीक मिळाला पाहिजे येवढीच त्याची आकांक्षा असते; आणि त्याच्या वर्तनांतील व्यंगें बाहेर काढण्यास कितीतरी लोक टपून असतात. त्यामुळें त्याची पावलोपावलीं निराशा होत असते. त्यांत एखादा प्रतिस्पर्धी भेटला कीं मग कामच आटोपलें; त्याच्या श्रमांला व निराशेला मगतर पारावारच नाहीं. कदाचित् यश आलेंच तर आंगीं बडेजाव शिरतो. त्यामुळें लोक पाठीमागें त्याचा तिरस्कार आणि उपहास करितात; व लोकांवर छाप बसविण्याची जी त्याची इच्छा असते ती सफल होत नाहीं. याप्रमाणें कीर्ति ही सर्व

१ ते (लोक) स्तुति करितात, कौतुक करितात, पण स्तुति कोणाची, आणि कौतुक कशाचें हें त्यांचें त्यांनाच माहित नसतें; एकाच्या मागें दुसरा जात असतो.

लोकांना मिळत नाहीं; पण त्यांतले त्यांत ज्या महत्वाकांक्षी मनुष्यास तिच्याशिवाय कांहीं सुचत नाहीं त्यास तर ती अगदींच दुष्प्राप्य. जलाशयांतील तरंगांचें वर्तुल ज्याप्रमाणें वाढत वाढत जाऊन अखेरीस नाहींसें होतें त्याप्रमाणें महत्वाकांक्षी मनुष्याच्या इच्छा वाढत जाऊन अखेरीस तो स्वतःच नाश पावतोः किंवा,

झाले जीर्ण मनीं मनोरथ, पहा, मी वंचलों यौवना, ।
होते जे गुण सर्वही विफल ते झाले गुणज्ञाविना, ।
युक्तायुक्तविचार काल न करी निश्शंक सर्वात्मना, ।
आतां हें सुचलें, दुजी गति नसे गौरीशपायांविना.॥

या श्लोकांत पण्डितांनीं वर्णन केल्याप्रमाणें त्याची अगदीं अनुकंपनीय स्थिति होऊन जाते. ज्यांच्यापासून महत्वाकांक्षी मनुष्य नांवलौकिकाची हांव धरतो ते जरी विद्वान् असले, तरी मनुष्यच आहेत. कोणाच्या अंतःकरणांतील विचार त्यांस थोडेच कळणार? आणि कदाचित् कळले असें जरी क्षणभर मानलें, तरी त्या विचारांबद्दल योग्य गौरव करणें किंवा शासन देणें हें त्यांचे हातीं नसतेंच. तेव्हां प्रत्येकाच्या योग्यतेनुरूप बक्षिस देणारा किंवा दंड करणारा असा जो सर्वांतर्यामी जगच्चालक त्याजकडूनच आपल्या प्रत्येक कार्याला शाबासकी मिळाली पाहिजे, मग तें कार्य दुसऱ्या कोणास पसंत पडो अगर न पडो, अशी इच्छा धरून त्याप्रमाणें प्रारंभ केला तर तें किती वंदनीय आणि अनुकरणीय आहे बरें?

७ विषय हा आळस, लोभ यांप्रमाणें अनेक व्याधि व दुर्व्यसनें यांचा आश्रयदाता आहे. "कोटें जाकिटें चढवुनि आंगीं घेरा राखा चला

---

१ 'केरळकोकिळ' ग्रहदशेचा फटका. व. ९. अं. ३.

झुका" अशा तऱ्हेच्या केवळ ऐहिक सुखमय ज्या आशा असतात त्यांस विलासतृष्णा ह्मणतात. विलासतृष्णेचा अतिरेक झाला ह्मणजे तिला विषयासक्ति हें नांव देतात. विलासतृष्णेपासून प्रथमतः द्रव्याची हांव सुटते; नंतर आंगांत आळस शिरतो; आणि शेवटीं सर्व शरीर व मन व्यसनाधीन होऊन जातें. विलासतृष्णा किंवा इष्कबाजी हीच जेव्हां इतिकर्तव्यता असते, तेव्हां तिच्यापासून असले भयंकर दुर्गुण उत्पन्न होतात कीं, त्यांमुळें बुद्धि, मननशक्ति इत्यादि सर्व पार नष्ट होऊन जातात. बोलण्याचा मोहकपणा, आणि चैन करण्याची बेताल इच्छा हीं मात्र शिल्लक राहतात. विषयी मनुष्याचें मन क्षुद्र होऊन गेल्यामुळें त्यास खरें सुख कोणतें हें कळत नाहीं: कोणालाहि चार थापा द्याव्या, फसवावें, पैसे उपटावे, त्यावर दोन दिवस चैन करावी, यांतच त्याला ब्रह्मानंद ! पोटाची दामटी वळली तरी झिरझिरीत मलमलीचा तो लांब सदरा, त्यावरून जरीच्या गुंड्या लावलेलें तें निळ्या साटणीचें जाकीट या वस्तु अवश्य लागतात. तारुण्यांत मनोवृत्ति ताब्यांत नसल्यामुळें हा विकार फारच जोरांत असतो. त्या वेळीं याला ताब्यांत आणण्याचा प्रयत्न न झाल्यास आंग्ल ग्रंथकार स्टील यानें ह्मटल्याप्रमाणें तो तरुणपणांत आपला बदलौकिक करील आणि वृद्धपणांत लाजेनें खालीं मान घालवयास लावील.

८ कित्येकांस तमाशे आणि नाटकें पाहण्याचा छंद असतो. त्यांत ते रात्रीच्या रात्री घालवितात. गांवांत एखादी नाटक कंपनी किंवा तमासगीर मंडळी आली कीं, त्यांतलें एक नाटक अगर एक तमाशा सुना जाऊं न देण्याची यांची प्रतिज्ञा असते ! या नाटकांनीं आणि तमाशांनीं कितीक धनवान् लोकांच्या हातीं नरटी दिली आहे; आणि अनेक सदृढ, सच्छील व सुस्वरूप बालकांस दुर्गुणी, रोगी व व्यसनाधीन करून सोडलें आहे. 'नाटक ह्मणजे समाजस्थितीचें चित्र; त्यापासून मनोरंजन

उत्तम प्रकारें होऊन चांगला उपदेश मिळतो,' असे उद्गार नाटकांच्या चहात्यांच्या तोंडून प्रत्यहीं ऐकूं येतात. परंतु नाट्यकला हल्लीं दुर्व्यसनी लोकांच्याच हातीं सर्वतोपरी पडल्यामुळें, तिचा हलकट लोकांच्या मनोरंजनाखेरीज समाजास दुसरा उपयोग नाहीं. यावरून नाट्यकला 'समाजविघातक आहे' अशी कोणीं शंका घेऊं नये. ती मूळची उत्तम आहे; तिच्यापासून उपदेश मिळून समाजसुधारणेला मदत होते, ही गोष्ट खरी; पण पूर्वोक्त दोषांमुळें तिची स्थिति अत्यंत शोचनीय आहे. हिंदुस्थानांत हल्लीं अशा किती नाटक मंडळ्या आहेत कीं ज्यांत विडी, अफू, गांजा, दारू यांपैकीं एकहि व्यसन सांपडणार नाहीं ? दारूचा तर इतका अतिरेक झाला आहे कीं, खुद्द नाटकाच्या दिवशीं संध्याकाळपर्यंत 'आज नाटक कोणतें' याची नटमहाराजांनां दाद नसते ! कित्येकांना तर पडद्यांतून बाहेर पडण्यापूर्वीं एक व पडद्यांत गेल्याबरोबर एक असे दोन दोन ग्लास दर प्रवेशाला लागतात ! आणि कित्येक मंडळ्यांचीं नाटकें तर आयत्या वेळीं कांहीं तरी सबब सांगून बंद ठेवावीं लागतात ! ! बरें, कित्येकांचें खाजगी वर्तन तरी किती छचोर व फाजिलपणाचें असतें ? कोणी तरी संभावित मनुष्य आपखुषीनें मंडळींत घटकाभर जाऊन बसेल काय ? आतां यांत समाजाकडे अगदींच कांहीं दोष नाहीं असें माझें ह्मणणें नाहीं. वरील व्यसनांना आणि व्यसनासक्त मनुष्यांनां समाज बहिष्कृत करित नाहीं हाच त्याचा दोष. असो; तेव्हां धूम्रपान, सुरापान, परदारासक्ति इत्यादि व्यसनांनीं प्रायः अधःपतन पावलेल्या नाटकवाल्यांनीं समाजोपदेशकांचें नाजुक काम करणें हें किती उपहासास्पद आहे बरें ? नाट्यकला जरी चांगली असली, तरी ती हल्लीं आत्मोन्नतीला विघातक असल्यामुळें तिच्यांत वेळ घालविणें श्रेयस्कर नाहीं.

९ गप्पा मारित बसणें ही एक पुष्कळांच्या आयुष्यक्रमांतील अवश्य बाब आहे. मध्याह्नकाळीं ज्याप्रमाणें पोटास कांहींतरी भर लागतेच, त्याप्रमाणें या गप्पीदास मंडळीच्या तोंडास चर्वण करण्याकरितां निदान सायंकाळीं तरी कांहीं एक विषय लागतो. यांच्या चर्चेचे विषय मोठे गमतीचे असतात. त्या अमक्या शेटजीनें आज सहस्रभोजन केलें, त्यांत भाजीला मीठ थोडें कमी होतें, सार अंबटढाण झालें होतें. अथवा लाडूला साखर बेताची पडली होती, अशा प्रकारचा भोजनप्रकरणासंबंधीं एकादा विषय असतो; किंवा त्या अमक्या गृहस्थाची आणि त्याच्या त्या मधल्या मुलाची आज खडाजंगी उडाली, घेलाशेटानें वारंट काढल्यामुळें तमक्या जहागिरदाराच्या घरावर उद्यां जप्ती येईल, अगर तो अमक्या सावकाराचा मुलगा बदफैली होत चालला आहे, असले कुटिल, निंदास्पद आणि रिकाम्या उठाठेवीचे विषय चर्चेत असतात; आणि मोठ्या वीरश्रीचे विषय निघाले ह्मणजे आमचे आजोबा एका बैठकीस पन्नास लाडू खात होते; पानाला चुना लावणें न झालें तों पोटभर जेऊन उठत होते; किंवा त्या तमक्या भटजीचे पणजोबा एका दिवसांत साठ कोस मजल करीत असत, असले निघावयाचे. सौम्य गोष्टींवर बोलणें चालल्यास "काकस्य कतिवा दन्ताः? मेषस्यांडं कियत्पलम्? गर्दभे कति रोमाणि?—" या प्रकारच्या आणि कांहीं कर्णोपकर्णी ऐकिलेल्या गोष्टी—ज्या कळल्यास कोणास कांहीं फायदा नाहीं व न कळल्यास कोणाचा कांहीं तोटा होत नाहीं—त्या असावयाच्या; आणि यावर जेव्हां हातवारे करून त्यांचा वादविवाद चालतो, तेव्हांचें त्यांचें तें अद्भुत वक्तृत्व आणि अश्रुतपूर्व कोटिक्रम मोठमोठ्या विद्वानांनीं देखिल एकदां पहावा. आपल्या वंशजांचें पांडित्यप्रदर्शन पाहून त्यांचे पितर वरती धन्यता मानीत असतील नाहीं बरें? हरहर! सर्व सृष्टीस केवळ ललामभूत अशा मनुष्यप्राण्यानें आ-

पल्या जिव्हेचा, शक्तीचा आणि बहुमूल्य वेळाचा असल्या शुष्क गोष्टींचा ऊहापोह करण्यांत आणि दुसऱ्याचीं गृहच्छिद्रें उघडीं करण्यांत सदा सर्वदा उपयोग करावा काय? वेळ घालविण्यास दुसरा कांहींच उपाय नाहीं?

१० वरील गप्पा मारणाऱ्या मंडळीपेक्षां ज्यांना चार अक्षरें येत असतात, ते आपला वेळ अश्लील नाटकें, कादंबऱ्या आणि वर्तमानपत्रांतील जाहिराती वाचण्यांत खर्च करितात. वर्तमानपत्राच्या बाहेरील बाजूची कित्येकांना इतकी गोडी असते कीं, सर्वप्रकारच्या नेहमीं येणाऱ्या जाहिराती त्यांना तोंडपाठ होऊन जातात. त्यांच्या हातीं वर्तमानपत्र पडलें कीं, आंतील अग्रलेख, स्फुट सूचना किंवा महत्वाच्या विषयांसंबंधीं पत्रव्यवहार इकडे ते ढुंकून सुद्धां पाहणार नाहींत. नाटकें आणि कादंबऱ्या यांची लोकांना किती आवड आहे, हें ठाणें ग्रंथसंग्रहालयाच्या वार्षिक अहवालावरून कळून येण्यासारखें आहे. इतर ठिकाणच्या पुस्तकालयांचे अहवाल याप्रमाणें प्रसिद्ध झाल्यास, 'इंग्रजी नाव्हेल्स' आपल्याकडील 'मनोरंजक स्त्रीचरित्र' 'गुलबंकावली' 'नवनारींचीं चरित्रें' वगैरे पुस्तकांचीं कशीं पारायणामागून पारायणें होतात हें समजेल. असलीं अनेक प्रकारचीं छिचोर पुस्तकें वाचल्यानें बुद्धि अगदीं क्षुद्र होऊन जाते, स्मरणशक्तीचा ऱ्हास होतो; आणि कुमार्गाकडे मनःप्रवृत्ति होण्यास ज्यांचे साहायाची अपेक्षा असते, त्या कुकल्पना मनांत शिरून त्यांवर अधिकाधिक विचार सुचूं लागतात; व अखेरीस वेळेचा कांहींएक सदुपयोग न होतां तो प्राणी आला तसा—किंबहुना जास्त निकृष्ट स्थितींत येऊन—ह्या जगांतून जातो.

११ वेळेचा दुर्व्यय करणाऱ्या लोकांचा आणखी एक वर्ग आहे. या वर्गांतील लोकांस धड सत्कर्मींहि म्हणतां येत नाहीं. धड दुष्कर्मींहि ह्मणतां येत नाहीं. 'खाना पीना सुखसे सोना' हीच त्यांची कर्तव्यमर्यादा असते. ते जिवंत असले तरी त्यांबद्दल कोणास आनंद नसतो, किंवा ते

मरण पावले तरी त्यांच्याकरितां कोणी चार अश्रु गाळीत नाहीं. ते जरी सदोदित कामांत गुंतलेले दिसतात, तरी त्यांचा आणि पशूंचा उद्योग सारखाच असतो. तो उद्योग ह्मटला ह्मणजे 'आहार—निद्रा—भय—मैथुनानि' हा होय. लोभी, महत्वाकांक्षी, विषयी, आणि दुसरे कुमार्गी लोक जरी दुष्कर्में करितात, तरी स्वहेतु साधण्यांत त्यांच्या हातून दुसऱ्याच्या उपयोगीं पडेल असें कांहीं तरी होतेंच होतें. परंतु या पोटार्थी लोकांचा मात्र कोणास काडीइतका उपयोग नसतो. समाजाकडे बारकाईनें पाहूं लागल्यास बरेच लोक असे आढळतील कीं, ज्यांना सर्व आयुष्यांत खाणें, पिणें आणि निजणें यांशिवाय चौथी गोष्ट ठाऊक नाहीं. अशाच लोकांमुळें रोमचें राष्ट्र इतके दिवस धूळ खात पडलें होतें. पोटाची खळगी भरण्याशिवाय मनुष्याला दुसरें कांहींच कर्तव्य उरलें नाहीं ? विधात्यानें हा सर्वश्रेष्ठ मानवदेह केवळ उदरंभर होऊन पशुवृत्ति अंगिकारण्यासाठींच निर्माण केला आहे काय ? तसा तर त्याचा हेतु दिसत नाहीं; आणि कदाचित् तसा हेतु असताच तर बुद्धि, विवेक, ज्ञानसंपादनशक्ति, इत्यादि पशूंच्या ठायीं सहसा न आढळणाऱ्या गोष्टी त्यानें मनुष्याला दिल्याच नसत्या. मनुष्यासारख्या समंजस प्राण्यानें अशा उत्तम शक्तींचा दुरुपयोग करून आपलें जिणें मातीमोल करावें, ही अतिशय खेदजनक गोष्ट आहे.

१२ बऱ्याच लोकांचा छानछुक पोषाकांत फार वेळ जातो. पोषाक स्वच्छ आणि नीटनेटका असावा याबद्दल वाद नाहीं. घाणेरडे कपडे वापरावे असें कोणी ह्मणणार नाहीं. परंतु कित्येकांच्या पेहेरावांत जी ऐट—जो नखरा—दिसतो, तो नको. धैर्य, साहस, उद्योगशीलता इत्यादि आपल्या राज्यकर्त्यांच्या आंगीं असणाऱ्या सद्गुणांची नक्कल करण्याच्या ऐवजीं त्यांच्या पोषाकाची अगदीं तंतोतंत नक्कल करण्यांत मात्र पुष्कळजण तरबेज झाले आहेत; दोन दोन शेर घाम निघाला तरी तें त्यांच्या आंगावरचें जड ओझें निघावयाचें नाहीं; बाहेर जाण्यापूर्वी पोषाक कर-

ण्याला एक दीडतास लागावयाचा. असले चाळे करणें मूर्खपणाचें आहे हें कोणीहि जाणता मनुष्य कबूल करील; तसेंच केळीचें पान लावून तुमान चढविणें, घटका घटका कंगव्यानें केंस साफ करीत बसणें वगैरे कांहीं लोकांच्या चाली वेडेपणाच्या होत. खरोखर अंतःकरण जर सद्गुण-सुविचाररूपी वस्त्रांनीं विभूषित नाहीं, त्या ठिकाणीं जर अविवेकादिकांची दुर्गंधी सुटली आहे, तर मल-मांस-मूत्र-इहींकरून युक्त अशा या देहयष्टीस उत्तमोत्तम वस्त्रप्रावर्णें, बहुमोल रत्नालंकार यांनीं सजवून काय उपयोग ? पैशाचा, श्रमाचा आणि वेळेचा तो केवळ दुर्व्यय होय.

१३ दुर्वर्तनी लोकांचा वेळ अशा रीतीनें जातो; कोणी झोंप घेतात, तर कोणी आळसांत दिवस काढितात; एक लोभांत गुंततो; तर दुसरा धनसंचयाचे मागें लागून आयुष्य व्यर्थ दवडतो; तिसरा एक महत्वाकांक्षेला बळी पडतो; कोणी विषयलंपट होऊन द्रव्य, अब्रू, व शरीर यांवर पाणी सोडतो; कोणास आपला वेळ वृत्तपत्रांच्या जाहिराती पाठ करण्यांत खर्चणें आवडतें; कित्येक लोकांच्या जीविताचा तमाशा झाला तरी त्यांचें नाटकें व तमाशे पाहणें सुटत नाहीं आणि कोणाला पोटोबाशिवाय कांहींच सुचत नाहीं; असे कुमार्गवर्ती जनांचे वेळेचा दुर्व्यय करण्याचे असंख्य मार्ग आहेत, त्यांपैकीं, थोड्याशांचें या ठिकाणीं दिग्दर्शन मात्र केलें; संपूर्ण वर्णन करूं लागल्यास मोठमोठे ग्रंथ होतील. सत्कर्मी लोकहि वेळेचा थोडा थोडा अपव्यय करितात, त्याचा विचार पुढील भागांत करूं.



भाग ४.

वेळेचा दुर्व्यय होण्याचीं दुसरीं कारणें.

'ऐसे दोष हे मूर्त । आंगीं वाजों असती पाहत ।
यें जाणतांही कैंवि येथ । प्रवर्तावें ॥'

—श्रीज्ञानेश्वर.

[1]'While we remain in this life, we are subject to innumerable temptations, which, if listened to, will make us deviate from reason and goodness.—The spectator.

सहा अडचणी—अनिश्चितपणा—अनियमितपणा—उद्यां—आवांक्याबाहेर कामें अंगावर घेणें—हातचीं कामें मध्येंच सोडणें—सारांश.

१ आयुष्याचा सद्व्यय व्हावा अशी ज्यांची इच्छा असते, व त्याप्रमाणें प्रयत्नही चालू असतात, त्यांच्या मार्गांत अनेक अडचणी येतात. त्यांतील मुख्य सहांचा या ठिकाणीं विचार करूं. त्या सहा अडचणी पुढीलप्रमाणें होत. १ अनिश्चितपणा, २ अनियमितपणा, ३ आजचें काम उद्यांवर टाकणें, ४ आवांक्याचे बाहेर कामें आंगावर घेणें, ५ कामें अर्धींमुर्धीं टाकणें,

१ आपल्या कुडींत प्राण आहे तोंपर्यंत आपल्यावर पुष्कळ मोहजालें येतील आणि त्यांमध्यें जर आपण मन घातलें, तर तीं आपल्याला विवेकशक्ति व साधुवृत्ति यांपासून दूर करून भटकावयास लावतील—स्पेक्टेटर.

आणि ६ कोणत्याहि कार्याला आरंभ न करितां उगीच बेत करीत बसणें. यांचा आतां यथाक्रम विचार करूं.

२ झोंप आणि सुस्ती यांमुळें चांगल्या चांगल्या गृहस्थांचाहि बराच वेळ फुकट जातो. आपलें नुकसान होत आहे हें त्यांस कळत असतें; पण 'निश्चयाचें बळ' नसल्यामुळें त्यांचा नाइलाज होतो. पहाटे पांच वाजतां उठून शौचमुखमार्जनादि उरकावयाचें, आणि नंतर स्नान वगैरे प्रातर्विधि आटोपून आपल्या नित्याच्या उद्योगास लागावयाचें असा त्यांपैकीं पुष्कळांचा इरादा असतो; परंतु झोंप यांच्या स्वाधीन नसल्यामुळें हे सातसाडेसात खेरीज जागेच व्हावयाचे नाहींत. जाग आल्यानंतर जांभया देत देत गादीच्या बाहेर पडण्यास सुमारें एक तास लागावयाचा. मग तोंड धुणें वगैरे होईपर्यंत साडे आठ नऊ वाजण्याची वेळ येते. झालें; ज्या वेळीं मन अगदीं उल्लसित असून काम करण्यास आंगांत फार हुषारी असते, ते हे सकाळचे तीन तास फुकट गेले. फाजील झोंपेनें आंग जड झाल्यामुळें सबंध दिवस असाच सुस्तींत जावयाचा. त्या दिवसाचीं सर्व कामें वेळचे वेळीं न झाल्यामुळें राहिलेलीं दुसरे दिवसावर पडलीं, आधले दिवशीं काम भराभर आटपावें लागल्यामुळें झालेल्या श्रमांनीं दुसरा दिवस पहिल्यापेक्षां जास्त त्रासदायक होतो, आणि एकंदर सर्व गोष्टींचा घोंटाळा होऊन जातो. एका अनिश्चितपणामुळें काय तोटा झाला तो पहा; सुस्ती आणि झोंप वाढली; कामांत चालढकल करण्याची वाईट संवय आंगीं जडली; आणि सर्व कामाची घडी विसकटून गेली.

३ पुष्कळांना काम वेळचे वेळीं करवत नाहीं, यामुळें त्यांचा अतिशय तोटा होतो. वक्तशीर काम न करणारा मनुष्य जितकी मेहनत घेऊन एखादें काम करतो, त्याच्या दुप्पट काम, तेवढ्याच वेळांत आणि

निम्या श्रमानें नियमित वेळीं काम करणारा मनुष्य करतो; आणि त्याच्या कामापासून त्यास व दुसऱ्यांसहि संतोष होतो. आपल्याकडील जुन्या कारागीर वगैरे लोकांत ही अनियमितपणाची खोड फारच आढळते. एखाद्या जुन्या चालीच्या चिताऱ्यास पंधरा दिवसांच्या मुदतीनें एक तसबीर तयार करून आणण्यास सांगा. पंधरवड्याच्या ठिकाणीं त्यानें त्या कामास चार महिने न लाविले, तर मग त्याचें कसब तें काय राहिलें? तसबिरीच्या मालकानें त्याच्या घरीं खेटे घालीत रहावें, आणि यानें 'हो, हो, उद्यां खास देतों,' असें ह्मणतच असावें. या लोकांना वाटत असतें कीं, दुसऱ्यांनीं आपल्या घरीं असे हेलपाटे घातल्याशिवाय आपला नांवलौकीक वाढणार नाहीं, आणि आपणास पैसाहि मिळणार नाहीं. एका गिऱ्हाइकास असा त्रास दिल्यानें दुसरीं दहा बुडतात, या तत्त्वाकडे ते लक्ष पोंचवीत नाहींत. अनियमितपणानें काय काय तोटे होतात याचा अनुभव बहुतेकांस आहेच. विद्यार्थ्यांचें तर या सवईनें फारच नुकसान होतें. कारण कोणत्याहि बऱ्या वाईट सवंयी ताबडतोब जडतात त्या याच वयांत. या वयांत लागलेली खोड मोठेपणीं घालविणें अतिशय अवघड काम आहे. रोजचा नेमून दिलेला अभ्यास आळसामुळें पुढें ढकलल्यानें ऐन परीक्षेच्या वेळीं कामाचा बोज्ञा पडून आजारी पडलेले बरेच विद्यार्थी आपणास सांपडतील. ही खोड मोठेपणीं फार नाडते. काम वक्तशीर न झाल्यानें किती वेळ फुकट जातो याची कोणास फारशी कल्पना नाहीं. नेहमींचीं कामें नियमितपणें वेळचे वेळीं झालीं ह्मणजे कोठेंहि घोंटाळा न होतां अवांतर व्यवसायास मुबलक वेळ मिळतो.

४ ठरल्या वेळीं काम न केलें तर कामाची चालढकल करण्याची संवय लागते. एखाद्याला पुष्कळ उद्योग असले आणि त्यानें आज करावयाचें

काम उद्यांवर टाकलें, तर तें एक वेळ चालण्यासारखें आहे; परंतु ज्यांस फारसें काम नाहीं असेच पुष्कळ लोक आपल्या नित्याच्या कामांत चालढकल करतांना आढळतात. याचें कारण असें दिसतें कीं मनुष्याला उद्योग कमी असला ह्मणजे आंगांत आळस वाढतो, आणि 'करून टाकूं घटकाभऱ्यानें' असें ह्मणण्याखालीं सर्व वेळ जातो. घटकेमुळें दिवस, दिवसांमुळें वर्ष फुकट जाऊन सगळ्या आयुष्याचा नाश होतो. "श्वः कार्यमद्य कुर्वीत पूर्वाण्हे चापराण्हिकम् । न हि प्रतीक्षते मृत्युः कृतमस्य न वा कृतम् ॥" असें एक संस्कृत वचन आहे. याचा अर्थ असा कीं, उद्यांचें कार्य आज करावें, आणि दुपारचें सकाळींच उरकून टाकावें. कारण मृत्यु आला ह्मणजे तुमचें काम झालें किंवा न झालें हें तो पहात नाहीं. स्कॉटलंडचा जेम्स राजा सन १४३६ च्या फेब्रुवारींत फोर्थची खाडी ओलांडून पर्थ शहरीं चालला असतां वाटेंत एक हायलंडर्स (पर्वतनिवासी) लोकांची एक बाई त्याजकडे येऊन त्याला मारण्याचा झालेला कट त्यास सांगूं लागली; पण त्यानें तिजकडे लक्ष दिलें नाहीं. दुसरे दिवशीं ती पुन्हा पर्थ शहरीं त्याजकडे गेली; परंतु राजानें 'उद्यां सकाळीं ये' ह्मणून सांगितलें; नंतर दोन तासांनींच सर रॉबर्ट ग्रॅह्यामनें राजाचा खून केला. आपल्या इतिहासांतही हुबेहुब असेंच एक उदाहरण आहे. ज्या दिवशीं श्रीमन्नारायणराव पेशवे यांचा वध झाला, त्याच दिवशीं श्रीमंतांची स्वारी सकाळीं पर्वतीवर दर्शनास गेली असतां मागें वाड्यामध्यें आनंदीबाईच्या पुढ्यांतील दासी गजाऊ, तुळाजी पवार ह्यांची बरीच धांदल झाल्याची चाफाजी टिळेकर ह्याच्या दृष्टोत्पत्तीस आली. व श्रीमंतांच्या जिवावर संकट येण्यास आतां क्षणाचाही अवधि राहिला नाहीं असें त्याच्या मनानें घेतलें. ह्मणून तो तसाच धांवत धांवत पर्वतीवर जाऊन श्रीमंतांस भेटला. श्रीमंत पायऱ्या उतरत होते, तेथेंच

त्यानें आज वाड्यांत कांहीं गडबड असून आपल्या जिवावरचा प्रसंग आहे असें सांगितलें. तेव्हां बरोबर हरिपंत फडके होते त्यांजकडे पाहून श्रीमंत ह्मणाले. "तात्या ऐकलेंतना ? हा काय मजकूर आहे ? फडक्यांनीं विनंती केली, कीं श्रीमंतांचें भोजन आटपेपर्यंत मीही भोजन करून वाड्यांत येतों व सारा बंदोबस्त करतों. पण तात्या जेऊन जाईपर्यंत वाड्यांतला सर्व कारभार आटोपला सुद्धां ! ही गोष्ट सर्वत्र महशूरच आहे. हेंच जर तात्यांनीं ढकलाढकलीचें काम केलें नसतें व 'उद्याचें काम आज करावें' हा नियम पाळला असता, तर नारायणरावासारख्या राजबिंड्याचा बळी पडला नसता. 'पाहूंया घटकाभरानें' असें ह्मणणारांनीं ह्या एका तासाचा परिणाम किती भयंकर झाला हें नीटपणीं ध्यानांत ठेवावें. तेव्हां आपण काम उद्यांवर टाकावयाचें तें तरी कोणच्या आधारावर ? वेळ झपाट्यानें जात आहे, आणि स्वतांच्या जगण्याची कोणी एका घटकेची खात्रीं देऊं शकत नाहीं; अशा स्थितींत कर्तव्यांत सुस्ताई करणें फार वेडेपणाचें आहे. शिवाय यापासून आपला दोन प्रकारें तोटा होतो; एक कामांत सगळी अव्यवस्था होऊन जाते. कामाची शिस्त एकदां विघडली ह्मणजे किती त्रास होतो याची कल्पना तशा स्थितींत असणाऱ्या मनुष्याखेरीज इतरांस यावयाची नाहीं. दुसरा तोटा ह्मटला ह्मणजे गेलेली संधी परत न मिळणें हा होय. वनस्पति फळफळावळ वगैरे जिनसा मिळण्याचे ऋतु ठरलेले असतात. विद्या लहान वयांतच करावयाची असते; पाउणशें वर्षांचा ह्मातारा ती जर करूं ह्मणेल, तर त्यास ती साधणें नाहीं. तरुण असतांच शरीर कसवावयाचें असतें; "अंगं गलितं पलितं मुण्डं दशनविहीनं जातं तुण्डम् ।" अशा स्थितींत तें साध्य नाहीं. वृद्धपणाच्या अनेक गोष्टी तरुणपणीं करतां येत नाहींत. प्रत्येक गोष्टीचा जो काल ठरलेला आहे, त्या वेळीं ती गोष्ट झाल्यास फायदा होण्याचा संभव

असतो; नाहींतर जन्मभर दुःखांत आणि कष्टांत दिवस काढले तरी ती संधि—तो फायदा—मिळणें नाहीं. तेव्हां आजचें काम उद्यांवर टाकल्यापासून आपलें फार नुकसान आहे. कॉटन कवि ह्मणतो:–

To-morrow is a period no-where found,
Unless perchance in a fool's calendar.
Wisdom disclaims the word, nor holds society
With those who use it.

याचा भावार्थ असा कीं, 'उद्यां' हें कालमान कोठेंहि सांपडत नाहीं. कदाचित् सांपडलें तर एखाद्या मूर्खाच्या पातड्यांत सांपडेल. शहाणा मनुष्य या शब्दापासून अलिप्त असतो व जे लोक याचा उपयोग करितात त्यांची तो संगतिहि धरीत नाहीं. कामांत चालढकल करणारांचें कालक्रमण कशा प्रकारचें असतें, याचें एड्वर्ड यंगनें फार मजेचें वर्णन केलें आहे. त्यांत तो ह्मणतो:—

At thirty man suspects himself a fool;
Knows it at forty and reforms his plan;
At fifty chides his infamous delay,
Pushes his prudent purpose to resolve;
In all the magnanimity of thought
Resolves and reresolves; then dies the same.

तीस वर्षांचें वय झालें ह्मणजे 'मी मूर्ख तर नाहींना?' अशी शंका मनुष्याला उद्भवते. चाळिशी उलटल्यावर 'आपल्या हातून खरोखर मूर्खपणा झाला,' हें तो उमजतो, व आपले बेत सुधारण्यास लागतो. 'पन्नाशीची झुळूक' लागली कीं जिच्या योगानें आपला एवढा बदलौकिक झाला त्या दिरंगाईच्या संवयीबद्दल संतापतो, निश्चयानें चालावें असा शहाण-

पणाचा संकल्प करितो, खूप विचार करून निर्धारहि करितों; पुन्हा अगदीं दृढ निश्चय करितो; नंतर मरतो तो जशाचा तसाच.

सारांश, मनाचा एक निश्चय नसल्यामुळें आंगांत आळस व झोंप वाढते; काम वेळचे वेळीं होईनासें होतें; नंतर कामांत चालढकल व्हावयास लागते; आणि शेवटीं सर्व अव्यवस्था होऊन जीविताची दैना दैना होते.

५ तसेंच जो मनुष्य आपल्या आवांक्याचे बाहेर कामें आंगावर घेतो त्याचाहि बराच वेळ फुकट जातो. कारण घेतलेलीं कामें संपवून टाकण्यासाठीं प्रत्येक काम तो जलदी जलदीनें आटोपीत सुटतो; परंतु त्यानें आपल्याकडून कितीहि घाई केली, कितीहि कष्ट सोसले, तरी सर्व कामें त्याच्यानें संपवत नाहींत. मग कांहीं कामें त्यास सोडून देणें भाग पडतें, आणि जीं झालेलीं असतात, तीं घाईघाईनें केल्यामुळें चांगलीं मनासारखीं वठत नाहींत. याप्रमाणें केलेलीं कामें, आणि त्यांस लागलेले श्रम व वेळ हीं व्यर्थ जातात; अतिशय श्रम झाल्यामुळें दुसरीं कामें करण्याचीहि आंगांत ताकद रहात नाहीं; असा दुहेरी तोटा होतो.

६ एकदम पुष्कळ कामें हातीं घेतल्यापासूनच तीं अर्धीं टाकून देण्याची वाईट खोड जडते. भर्तृहरीनें म्हटलें आहे कीं,

प्रारभ्यते न खलु विघ्नभयेन नीचैः
प्रारभ्य विघ्नविहता विरमन्ति मध्याः ।
विघ्नैः पुनः पुनरपि प्रतिहन्यमानाः
प्रारब्धमुत्तमजना न परित्यजन्ति ॥

ह्मणजे अगदीं खालच्या पायरीचे जे लोक असतात ते कोणत्याहि कार्यास संकटें येतील या भीतीनें हातच घालीत नाहींत; मध्यम जे अ-

सतात ते अडचण आली कीं, स्वीकृत कार्य सोडून देतात; पण अंगीकृत कार्यांत पुनः पुनः विघ्नें आलीं तरी न डगमगतां तें शेवटास नेण्याचा बाणा उत्तम जनांचाच. यावरून एखादें काम हातीं घेऊन संकट आलें कीं तें सोडून देणें, पुन्हा दुसरें घेणें, तें पुन्हा सोडून देणें, हें किती वाईट आहे हें लक्षांत येईल. वेळेचा व श्रमाचा तो निरर्थक व्यय आहे. तसेंच कित्येकजण 'आतां हें काम करावयाचें, मग तें करावयाचें,' अशा बेताखालींच सगळा वेळ फुकट दवडतात.

७ याप्रमाणें आयुष्याचा सद्व्यय करण्याच्या प्रयत्नाच्या आड येणारे हे सहा शत्रु आहेत. कांहीं लोक एकास तर कांहीं दुसऱ्यास हार जाऊन आपल्या आयुष्याचा नाश करून घेतात. कोणी अव्यवस्था आणि अनिश्चितपणा यांमुळें आपला वेळ फुकट दवडतात. कित्येकांचा वेळ पुष्कळ कामें हातीं घेऊन तीं न करितां आल्यामुळें व्यर्थ जातो. कांहींजण अर्धींच कामें सोडून देतात; सामान्य जनसमूहाच्या आयुष्यक्रमाची लाट या दिशेनें चालली आहे. जाणते लोक या लाटेपासून दूर असतात. त्यांच्यावर इचा परिणाम कांहीं होत नाहीं. उलट त्यांचेंच वर्तन या लाटेला नवी दिशा देऊं शकतें. ह्मणून सर्वांनीं 'महाजन' ज्या पंथानें गेले, हल्लीं जात आहेत, आणि पुढें जातील त्याचाच अंगीकार करावा.





भाग ५.

विवेकसुख.

संसारत्याग न करितां । प्रपंच उपाधी न संडितां ॥
जनांमध्यें सार्थकता । विचारेंचि होय ॥

—श्रीसमर्थ.

सुखाचे प्रकार—सुख आणि नांवलौकिक—प्रपंचसुख—विवेकसुख—पारत्रिक सुख—सुखप्राप्तीचा प्रारंभ.

१ यच्चयावत् जीवांचे उद्योग सुखाकरितां चालले आहेत हें मागें दुसऱ्या भागांत सांगितलेंच आहे. मोठ्या लोकांच्या मार्गानें जावयाचें तें सुखासाठींच, अर्थात् आपल्या वेळेचा व्यय सुख मिळविण्यास्तव करणें हें अगदीं योग्य आहे, आणि तसा व्यय होतोहि. परंतु खरें कल्याण—खरें सुख—कोणी जाणत नाहीं; बहुतेक जण मृगजळाच्याच मागें लागतात; यामुळें मागच्या दोन भागांत वर्णिल्याप्रमाणें वेळेचा नानाविध प्रकारें दुरुपयोग होतो. प्राणिमात्रास जें सुख मिळतें त्याचे मुख्य दोन प्रकार मानले आहेत. एक, इन्द्रियजन्य अथवा ऐहिक सुख आणि दुसरें इंद्रियातीत किंवा शाश्वत सुख. या दोहोंतून आपण कोणतें पतकरावें हा एक मोठा प्रश्न प्रत्येकापुढें आहे. दोन्हींपैकीं कोणतेंहि मिळविण्यास उद्योग हा केलाच पाहिजे, पण ऐहिक सुख इंद्रियांपासून उत्पन्न होतें; इंद्रियें मनाच्या

ताब्यांत आहेत; आणि मन अतिशय चंचल आहे. 'इन्द्रियांसकट स्थूळ,' सूक्ष्म व कारण हें देहत्रय नश्वर आहे आणि नश्वरापासून मिळणारें सुख तेंहि पण नश्वरच असणार. या क्षणिक सुखास्तव जिवापाड मेहेनत करावी लागते; आणि इतकी मेहेनत घेऊन आपणास तें सुख मिळेलच असा भरंवसा देतां येत नाहीं. शाश्वत सुखप्राप्तीस्तव पुष्कळ श्रम करावे लागतात, परंतु त्या चिरकालिक सुखाच्या साम्राज्यांत एकदां प्रवेश झाला ह्मणजे मग कशाचीहि भीति रहात नाहीं. त्या ठिकाणीं जीवास निरामय, निर्विकल्प आणि अक्षय आनंदाची स्थिति प्राप्त होते. आतां 'या दोन सुखांतून तुला कोणतें पाहिजे ?' असा एखाद्याला प्रश्न विचारल्यास, तो खात्रीनें दुसरेंच मागेल. परंतु असलीं अनुमानें कितीहि बिनचूक निघालीं, तरी व्यवहारांत आपलें वर्तन अगदीं उलट असतें. आपला देह कधींहि नाश पावणार नाहीं, चिरकालिक सुखाची आपणास जरूर नाहीं, अशा बुद्धीनें आपले सर्व उद्योग चालू असतात.

२ परमेश्वरानें हा देह मान व संपत्ति मिळविण्याकरितां निर्माण केला आहे, असें समजून प्रत्येक मनुष्य वागत असतो. कोठेंहि रोजगार धंदा करून धन संपादावें, जमीन जुमला करावा, चारचौघांत नांव मिळवावें येवढेंच आपलें कर्तव्य असें तो समजतो. एखादा धनिक मरण पावला ह्मणजे त्याचे शेजारी पाजारी ह्मणत असतात "कायहो, ते अमके तमके गृहस्थ वारले त्यांचें कसें सोन्याहून पिवळें झालें ! त्यांनीं लहानपणीं किती गरिबींत दिवस काढले, किती हाल सोसले, कांहीं पुसतां सोय नाहीं. जवळ आतां दहा पांच शेतें झालीं; पोरी, बाळी, लेकी, सुना, यांनीं घर कसें भरलेलें दिसत आहे. परवांच त्यांच्या नातवाचें लग्न झालें, आतां काय राहिलें होतें ? आणखी चार दिवस जगला असता म्हातारा, तर त्याच्या हातांनीं त्या नातसुनेचें कोडकौतुक झालें असतें

ह्मणा; असो नव्हतें त्याच्या नशिबीं त्याला कोण काय करणार ?" असे उद्गार आपण नेहमीं ऐकतों आणि अशाच रीतीनें आपलें नांव आपल्या पश्चात् लोकांनीं काढावें ह्मणून प्रत्येक मनुष्य धडपड करित असतो; 'मरावें परी कीर्तिरूपें उरावें' या सत्कवीच्या वचनांत 'कीर्ति' शब्दानें एवढाच अर्थ ध्वनित केला असेल ? आणि ती कीर्ति इतक्या स्वल्प उपायांनीं मिळते ? मग भट्टोजी दीक्षित, वराहमिहिर, भास्कराचार्य, कालिदास, नागोजी भट्ट, दासोपंत, मोरोपंत, डेमास्थेनीस, एडमंड बर्क इत्यादी महापण्डितांनीं जो एवढा जंगी खटाटोप केला तो निरर्थक होय? कारण कीर्ति इतक्या सोप्या मार्गानें मिळत असतां, त्यांनीं तिच्यासाठीं किती जबरदस्त परिश्रम घेतले आहेत ! खावें, प्यावें, मजा मारावी, द्रव्य, शेतवाडी मिळवावी, बायका पोरें इत्यादि परिवार जमवावा, ह्मणजे कीर्ति आपोआप घरीं चालून येते हें त्यांनां कळलें नाहीं ! खरोखर कीर्ति इतकी सुसाध्य नाहीं. तिच्यासाठीं हाडांचीं काडें करून प्रसंगविशेषीं प्राणहि खर्ची घालावे लागतात ! कदाचित् "कीर्तीपेक्षां मनुष्याला सुखाची लालसा जास्त असते, ह्मणून तो 'धनसुतदारा' इत्यादिकांकडे वळतो," असें कोणी ह्मणेल तर आपण बायका, मुलें बाळें, संपत्ति यांपासून खरोखरी सुख मिळतें कीं काय तें पाहूं.

३ सुखासाठीं मनुष्य प्रपंचांत पडतो, तरी तेथें त्यास वास्तविकसुख नसतें; पहा, तो लग्न करतो तें सुख मिळण्याकरितां, परंतु लग्नांतच सोयऱ्याधायऱ्यांच्या भांडणामुळें त्याला किती तरी त्रास सोसावा लागतो ! लग्न अगदीं शांततेनें पार पडलें असें जरी क्षणभर धरलें, तरी लग्नानंतर तत्संबंधीं झालेलें ब्रह्मस्व त्यास चैन पडूं देत नाहीं. शिवाय आणखी एका पोटाचा भार त्याजवर पडला तो निराळाच. आपली बायको कशी

निघेल, ती कजाग आहे कीं खुनशी आहे, तिचें इतर माणसाशीं पटेल किंवा नाहीं, तिला नट्टापट्टा आवडतो किंवा ती साधी भोळी आहे, वगैरे हजारों विवंचना त्यास तोंडीत असतात. ती भांडकुदळ असली कीं नवरदेवाचें सुखाचें रामायण आटोपलेंच. सुस्वभावाची असली तर मात्र थोडासा आशातंतु असतो. तरी संसाराची चिंता रात्रंदिवस असतेच. पुढें लेंकरेंबाळें व्हावयास लागतात; त्यांचें संगोपन, त्यांचीं दुखणींबाहणीं यासंबंधीं त्यास अतोनात खस्ता खाव्या लागतात. पुढें त्यांचीं लग्नें मुंजी इत्यादि कार्यें व्हावयाचीं, त्याकरितां खटपट सुरू होते. मुलांच्या शिक्षणासंबंधीं काळजी त्यासच वाहावी लागते आणि या सगळ्यांहून मोठी बाब ह्मटली ह्मणजे द्रव्याची. द्रव्यासाठीं तो काय काय कर्में करील आणि कोणाकोणापुढें तोंड वेंगाडील याचा कांहीं नियम नाहीं. व्यवहारांत त्याची पावलोपावलीं निराशा होत असते ती निराळीच. कोणी त्यास फसवितो, कोणी लुबाडतो, कोणी अपमान करितो; 'कसें करूं, काय करूं,' या अष्टाक्षरी मंत्राचा जप तो रात्रंदिवस करित असतो. जो जो प्रयत्न तो सुखाकरितां ह्मणून करितो, त्यांत त्याला दुःख आणि विवंचना हींच भेटतात. या भासमय ऐहिक सुखाकरितां, आपलें एकंदर आयुष्य फार अल्प ह्मणून जे लोक कुरकुर करित असतात, तेच 'आमच्या आयुष्यांतील अमुक एक भाग नाहींसा झाला तरी हरकत नाहीं' असेंहि ह्मणतात. लहान भावांस वाटतें कीं, "मी एकदम दादाएवढा झालों तर छान होईल; मग मला आई बाबा वगैरे वगैरे कोणी बोलणार नाहींत." दादासाहेब ह्मणत असतात "छे बुवा, हें असें ताटाखालचें मांजर होऊन कोठीं बसावें ? आपल्यापेक्षां बाबांची स्थिति बरी. माझ्या आयुष्याचीं मधलीं वर्षें एवढीं जातील तर बरें" बाबा ह्मणतात, "आजोबासारखें स्वस्थ बसावयास केव्हां मिळेल तें मिळो बुवा एकदाचें ! ह्या दगदगीचा

आतां वीट आला. पोरांना उद्योगधंद्याला लावून शेवटचे चार दिवस सुखांत गेले ह्मणजे मिळविली". आणि आजोबा "लहानपणचे सुखाचे दिवस पुन्हा मिळतील काय ?" असा प्रश्न उसासा टाकून विचारतात. एवंच सुखासाठीं हपापलेला मनुष्यप्राणी, बालपणचीं एकदोन वर्षें खेरीज करून जन्मल्यापासून मरेपर्यंत "यांत सुख मिळेल, त्यांत सुख मिळेल," असें करून चिंतानलांत एकसारखा तळमळत असतो आणि एवढें दुःख क्षणिक सुखाच्या निवळ आशेवर सोसावयाचें !


४ वरील विवेचनावरून मनुष्यास मुळींच सुख नाहीं असा कदाचित् कित्येकांचा समज होईल तो तसा होऊं देऊं नये. जोंपर्यंत मनुष्याची देहावरची ममता कायमची उडाली नाहीं, जोंपर्यंत दृश्य पसारा लटका आहे अशी त्याची खात्री झाली नाहीं, आणि आनंदकंदचित्स्वरूपाचे ठायीं त्याची मति पूर्णपणें रमली नाहीं, तोंपर्यंत त्यास शाश्वत सुख मिळणें नाहीं, ही गोष्ट खरी आहेः परंतु तापत्रयांनीं पीडिलेल्या प्राण्यास कांहींच सुख मिळूं नये असें मात्र नाहीं. त्यास काहीं आनंदाचे क्षण लाभतात; पण शंभर वर्षें आयुष्याच्या मानानें ते फारच थोडे होत. बाकीचें आयुष्य सुखांत जावें ह्मणून परमेश्वरानें मनुष्याला विवेकरूपी वल्ली दिली आहे. हिच्या योगानें तो सदा आनंदी असतो. त्याला कसलींहि संकटें येवोत, कितीहि दुःखकारक प्रसंग त्याजवर गुजरोत, ह्या अद्भुत वल्लीचा त्यानें उपयोग केल्यास त्याला तिळमात्र त्रास नाहीं. ही वल्ली मनोरूपी ओढाळ गुराच्या गळ्यांत बांधल्यास, तें इकडे तिकडे धांवणार नाहीं, एकेच ठिकाणीं डांबलें जाईल, आणि बुद्धीच्या अनुरोधानें चालेल. ह्या वल्लीचें अंजन केल्यास डोळ्यावरील अज्ञानाचा पडदा दूर होईल. सद्ग्रंथ, व असद्ग्रंथ, सद्गुण, व दुर्गुण, कर्तव्य व अकर्तव्य यांतील भेद त्यास नीट दिसतील; त्याचा प्रज्ञाचक्षु उघडून खऱ्या सुखाचा राजमार्ग त्यास दिसेल.

ज्याच्या दंडांत ही वल्ली बांधली असेल तोच 'जगीं सर्वसुखी' होय. ऐहिक आणि पारत्रिक सुखाचे भांडारखाने विवेकरूपी एकाच किल्लीनें उघडतात.

५ पारत्रिक सुख अनिर्वचनीय आहे. तें मिळविण्यास मनोजयाचा महापर्वत, षड्रिपु दमनरूपी खोल दऱ्या, आशारूप दुस्तर वैतरणी नदी, इत्यादी उल्लंघून जावें लागतें, तरी 'गुरुकृपेचा अरुण'–प्रकाश व 'आत्मा-दिनकरा'चीं बालकिरणें दृष्टीस पडतांच सर्व संकटांचीं अभ्रें पार वितळून जातात; तीं पुन्हां कधीं दिसावयाचीं नाहींत. त्या ठिकाणीं जें सुख–जो आनंद प्राप्त होतो तो अगदीं कल्पनातीत आहे. त्या महदानंदांत दंग असणारांची काय स्थिति असते, ती त्यांच्याच तोंडून प्रेमातिशयानें निघालेल्या शब्दांनीं किंचित्शी व्यक्त होते. "आषक आह्मी पिसे झालों ग! तुजवरते। नको होऊं नयनाच्या परते॥" हें देवनाथ महाराजांचें पद्य, "पूर आला आनंदाचा। लाटा उसळती प्रेमाच्या॥ १॥ बांधूं विठ्ठल सांगडीं। पोहून जाऊं पैलथडी॥ २॥" हा तुकोबारायाचा अभंग, अगर "वाटे जणुं नयनांत भरावें, हुंगावें, दृढ आलिंगावें, कीं चुंबावें॥" हें सत्पुरुष विठोबाअण्णांचें वचन त्या प्रेमरसाचें द्योतक होय. प्रेमानें थबथबलेल्या आणि 'आत्मादिनकराच्या' अखंड प्रकाशांत वावरणाऱ्या अंतःकरणांचे हे शब्द आहेत. असा प्रत्यय स्वतःला येण्यास—अशी उकळी स्वतःच्या अंतःकरणांतून बाहेर पडण्यास—अंतःकरण प्रेमरूप बनलें पाहिजे; अंतःकरण शुद्ध असल्याशिवाय तेथें प्रेमरसाचा पाझर फुटणार नाहीं; आणि विवेकरूपी झाडणीशिवाय अंतःकरण स्वच्छ होणार नाहीं. 'जे विवेकाची भाषा नेणती। ते मूर्ख केंवि पावती। मज ईश्वरातें'॥ या श्रीज्ञानेश्वरांच्या वचनावरूनहि हेंच सिद्ध होत आहे.

सारांश, शाश्वत सुखप्राप्ति करून घेण्यास मूळ प्रारंभ विवेकापासूनच केला पाहिजे.

६ हा पारत्रिक आनंद प्राप्त होण्यास आपलें ह्या जगांतील क्रमण चांगलें झालें पाहिजे. "जयाचें ऐहिक धड नाहीं । तयाचें परत्र पुससी काई" ॥ या श्रीज्ञानेश्वरींतील उक्तीवरून पाहतां आपण आधीं ह्या जगांतील कर्तव्यें उत्तम रीतीनें केलीं पाहिजेत. येथील जीवन सार्थ न केलें तर आपण शाश्वत सुखास मुकूं. याकरितां आपली वेळ आणि शक्ति यांचा व्यय आपलें ऐहिक धड करण्यांत झाला पाहिजे. तो कसा करावा याविषयींचा विचार पुढल्या भागांत करूं.



भाग ६.

वेळेचा सद्व्यय.

ऐक सदेवपणाचें लक्षण ।
रिकामा जाऊं नेदी येक क्षण ॥ ११—३.

—श्री समर्थ.

जीवितरूपी वस्त्राचीं छिद्रें—रोजनिशी—बातावेतानें खर्च—वेळेची वांटणी—घड्याळ—आत्मपरीक्षण—प्रपंचपरमार्थ—वाचन.

१ आपल्या जीवितरूपी वस्त्रास किती मोठमोठीं छिद्रें पडलीं आहेत, हें पूर्वींच सांगितलें आहे. त्या छिद्रांना रफू करून आपलें वस्त्र धड केलें पाहिजे. सर्वांत दोन मोठीं छिद्रें निद्रा आणि आळस यांनीं पाडलीं आहेत. पैकीं निद्रेस अजिबात टाळा देतां येणार नाहीं, ती घेतली पाहिजे. तिच्यांत व वामकुक्षींत जो फाजील वेळ जातो तो मात्र काढून घ्यावा. मनाचा निश्चय असेल तर आळसास समूळ उपटून टाकणें अशक्य नाहीं. त्याचप्रमाणें नियमित वेळीं काम न करितां त्यांत चालढकल केल्यानें आपला काळ आणि श्रम फुकट जातात; त्यांचाहि उपयोग अवश्य करून घेतला पाहिजे. या सर्व ठिकाणांतून लपलेला आणि क्षणाक्षणांनीं युक्त असा जो वेळ त्याचा योग्य व्यय क्षणांचाच चांगला उपयोग करून स्वकर्तव्य करण्यांत करावा.

२ मनुष्यजन्माचें मुख्य कर्तव्य आत्मोन्नति करणें हें होय; आणि ती आत्मोन्नति सद्गुण, सुविचार, सद्वर्तन यांनीं होते. यांची वाढ करण्या-

करितां रात्रंदिवस त्यासंबंधींचे विचार मनांत घोळले पाहिजेत; आपल्या हातून कांहीं वाईट कृत्य घडत आहे कीं काय, याबद्दल मनास नेहेमीं टोंचणी पाहिजे. ही टोंचणी—हे विचार कायम राहण्यास रोजनिशीची आणि आत्मपरीक्षणाची आवश्यकता आहे. रोजनिशीच्या योगानें आळस नाहींसा होण्यास बरीच मदत होईल. वेळचेवेळीं काम करण्याची संवय लागेल. निश्चयानें ती रोजनिशी चालू ठेवून त्याप्रमाणें वर्तन मात्र झालें पाहिजे. रोजनिशींत आज काय काम केलें, उद्यां काय करावयाचें याचा विचार आणि त्या कामाच्या ठरलेल्या वेळा हीं नमूद करावीं. झोंप, भोजन, वाचन, आणि इतर व्यवसाय यांच्या वेळा नेमून टाकाव्या; व त्या त्या वेळीं तें तें काम करावें; एक क्षणहि वायां जाऊं देऊं नये. थोरला प्लिनी नांवाचा रोमन गृहस्थ जेवतांना सुद्धां ग्रंथश्रवणाचें काम चालू ठेवित असे. शिकारीस निघाला तरी जवळ एखादें लहानसें पुस्तक घेऊन जात असे; अशाकरितां कीं, चाकर जाळें वगैरे पसरीपर्यंत जो वेळ जातो तो सत्कारणीं लागावा; आणि कदाचित् शिकार न सांपडली तर तिच्याकरितां गेलेला वेळ अगदींच फुकट जाऊं नये. गप्पांत जाणारा वेळ त्या दिवशींचे त्या दिवशीं इतर काम करून भरून काढल्याशिवाय जर्मन ग्रंथकार मिल्यान् थान् हा निजत नसे. प्यूतोली हा मक्केस प्रतिबंधांत असतांही त्यानें मुसलमानी धर्माविषयीं माहिती मिळविली. रघुनाथशास्त्री पर्वते यांनीं 'भाषाविवृत्ति' कारागृहांत असतांनाच लिहिली. कै. आगरकरांचें 'विकारविलसित' डोंगरीच्या तुरुंगांत निर्माण झालें, आणि 'आर्टिक होम्'चा जन्महि बंदिवासांतलाच आहे. 'निर्णयसागर' छापखान्याचे उत्पादक जावजी दादाजी हे आपली नोकरी संभाळून फावल्या वेळांत इतर कामें शिकले होते, आणि त्या फावल्या वेळेच्या जोरावर पुढें लक्षाधीश बनले. वरील सर्व गृहस्थांनीं आपल्या वेळेचा अगदीं

जपून काटकसरीनें उपयोग केला, ह्मणूनच ते एवढ्या योग्यतेस चढले. ते रोजनिशी ठेवित होते किंवा कसें हें जरी विशेषसें प्रसिद्ध नाहीं, तरी त्यांच्या कामाच्या वेळा अगदीं ठरल्यासारख्या दिसतात.

ॲडिसननें 'स्पेक्टेटर'च्या ३१७ व्या अंकांत एका व्यापाऱ्याच्या रोजनिशींतील एक उतारा दिला आहे; तशा प्रकारें रोजनिशी ठेवणें असल्यास ती न ठेवणें बरें.

---

१ सदर रोजनिशींतला लहानसा उतारा आणि त्याचें भाषांतर खालीं दिलें आहे.

Monday, eight o'clock. I put on my clothes and walked into the parlour.

Nine o'clock. Tied my knee-strings and washed my hands.

Hours ten, eleven and twelve, smoked three pipes of Virginia. Read the supplement and the Daily Courant. Things go ill in the north. Mr. Nisby's opinion thereupon.

One o'clock in the afternoon. Chid Ralph for mislaying my tobaco-box.

Two o'clock sat down to dinner. Mem. Too many plums, and no suet.

From three to four. Took my afternoon nap.

From four to six. Walked into the fields. Wind S. S. E.

From six to ten. At the club. Mr. Nisby's opinion about the peace.

Ten o'clock. Went to bed and slept sound.

सोमवार आठ वाजतां मी कपडे घातले आणि बैठकीच्या खोलींत फिरलों.

नऊ वाजतां. सदरप्रमाणें गुडघ्याजवळचीं बंधनें बांधलीं आणि हात धुतले.

दहा, अकरा, बारा. व्हर्जिनियाच्या तीन चिलमी ओढल्या. 'डेली कोरन्ट' आणि त्याची पुरवणी वाचली. उत्तरेकडे वाईट स्थिति आहे. मि. निस्बीचें त्यावर मत.

३ सेनेका म्हणतो 'कंजुषपणा हा एकंदरींत वाईट, पण वेळेचा कंजुषपणा हा एक मोठा सद्गुण आहे.' प्रत्येक वस्तूचा ज्याप्रमाणें व्यवहारांत आपण काटकसरीनें उपयोग करितों, त्याप्रमाणें आयुष्याचाहि अगदीं बातावेतानेंच खर्च केला पाहिजे. रोजचे २१६०० श्वास याप्रमाणें विधीनें प्रत्येक मनुष्याला आयुष्य दिलेलें असतें. या श्वासांचा ज्या मानानें आपण कमजास्त उपयोग करूं त्या मानानें आपण कमीजास्त वर्षें जगू. बसलेल्या स्थितींत हे श्वास १२ अंगुलें, चालतांना १८, निद्रेंत ३६, क्रोधावेशांत ९७ अंगुळें लांब जातात. यास्तव ज्यास पुष्कळ वर्षें जगावेंसें वाटत असेल, त्यानें या श्वासांचा योग्य विनियोग करावा.

४ आपलें आयुष्य अल्प असून आपलीं कर्तव्यें मात्र पुष्कळ आहेत. आणि तीं सर्व केलीं तरच आपलें जीवन सार्थ होईल. तीं सर्व होण्यास अमक्या वेळीं अमुक काम, तमक्या वेळीं तमुक काम अशी कांहीं एक ठरींव व्यवस्था पाहिजे. ती व्यवस्था कशी करावी हें थोर पुरुषांच्या चरित्रांवरून किंवा वागणुकीवरून दिसून येईल.

दोनप्रहरीं एक वाजतां—तंबाखूची डबी भलत्या ठिकाणीं ठेवल्याबद्दल राल्फची खरडपट्टी काढली.

दोन वाजतां—भोजनास बसलों. ध्यानांत ठेवणें—मनुका फारच होत्या; गुर्दांवरची चरबी अगदीं नव्हती.

तीन ते चार—वामकुक्षी.

चार ते सहा—शेतांतून हिंडलों. वारा आग्नेय आणि दक्षिण यांच्या दरम्यानचा होता.

सहा ते दहा—मठींत; तहाबद्दल मिस्टर निस्बीचें मत.

दहा वाजतां—निजलों; गाढझोंप लागली.

अशा रीतीनें मूळांत एक आठवड्याची हकीकत घेतली आहे. जागेच्या अभावामुळें येथें एकच दिवस घेतला आहे.

व्यावहारिक विषयांपैकीं समर्थांच्या 'बोधां'तून सुटला असा विषय क्वचितच. तेव्हां वेळेची वांटणी त्यांच्या मुखांतून निघाल्याशिवाय राहणार थोडीच. दासबोध दशक ११ समास ३ मधें ते ह्मणतातः–

"प्रपंच करावा नेमक । पहावा परमार्थविवेक ।
जेणें करितां उभये लोक । संतुष्ट होती ॥
प्रातःकाळीं उठावें । कांहीं पाठांतर करावें ।
येथान शक्ति आठवावें । सर्वोत्तमासी ॥
मग दिशेकडे जावें । जे कोणासिच नव्हे ठावें ।
शौच्य आचमन करावें । निर्मळ जळें ॥
मुखमार्जन प्रातःस्नान । संध्यातर्पण देवतार्चन ।
पुढें वैश्[1]यदेव उपासन । यथासांग ॥
कांहीं फळाहार घ्यावा । मग संसार धंदा करावा ।
सुशब्दें राजी राखावा । सकळ लोक ॥
ज्या ज्याचा जो व्यापार । तेथें असावें खबर्दार ।
दुश्चितपणें तरी पोर । वेढा[2] लावी ॥"
या कारणें सावधान । येकाग्र असावें मन ।
तरी मग जेवितां भोजन । गोड वाटे ॥
पुढें भोजन जालियांवरी । कांहीं वाची चर्चा करी ।
येकांतीं जाऊन विवरी । नाना ग्रंथ ॥
तरीच प्राणी शाहाणा होतो । नाहीं तरी मूर्खचि राहातो ।
लोक खाती आपण पाहतो । दैन्यवाणा ॥

बेंजामिन फ्रांकलिन यानें आपल्या दिवसाच्या चोवीस तासांची वांटणी पुढीलप्रमाणें केली होती.

---

१ वैश्वदेव. २ वेड लावितें, फसवितें.

"सकाळीं ५–८, प्रातःस्मरण, आज काय उद्योग करावयाचा याचा विचार, अभ्यास, फराळ व आज सत्कृत्य कोणतें करावयाचें या विषयींचा विचार.

८–१२ उदरनिर्वाहाचा उद्योग.

दुपारीं १२–२, जेवण, घरचा हिशेब पाहणें, वाचन वगैरे.

२–५, उदरनिर्वाहाचा उद्योग.

सायंकाळीं ५–९, वस्तु जागचे जागीं ठेवणें, संध्याकाळचें जेवण, गायन, वादन, खेळणें, संभाषण, व दिवसा कोणतें सत्कृत्य केलें याचें मनन.

रात्रीं ९–५, निद्रा."

प्रत्येकाच्या वेळेची वांटणी अशाच रीतीनें होणें शक्य नाहीं. ती ज्याची त्यानें प्रकृति, परिस्थिति यांना अनुरूप अशी करावी. पण कशीहि जरी वांटणी केली, तरी वरील फ्रांकलिनच्या उताऱ्यांतल्या 'आज कोणतें सत्कृत्य करावयाचें हें ठरविणें,' आणि 'आज कोणतें सत्कृत्य केलें याचें मनन,' या दोन गोष्टी प्रत्येकानें स्वीकारण्यासारख्या आहेत.

५ या ठिकाणीं वेळेची वांटणी करण्यांत फार उपयोगी आणि नेमलेल्या वेळीं काम करावयास लावणाऱ्या अशा एका वस्तूचा उल्लेख करणें अत्यंत अवश्य आहे. ही उपयुक्त वस्तु ह्मटली ह्मणजे घड्याळ होय. ह्या यंत्राची युक्ति मूळ ज्यानें शोधून काढिली, त्याचे मनुष्यजातीवर अवर्णनीय उपकार आहेत. हल्लीं जीं घड्याळें दृष्टीस पडतात, तीं युरोप, अमेरिका, जपान या देशांतून इकडे आलेलीं असतात. आपल्या कडील वेळ समजण्याचीं जुनीं साधनें ह्मटलीं ह्मणजे घटिकायंत्रें अगर आकाशस्थ तारका, ग्रह, नक्षत्रें इत्यादि. आकाशांतील या नक्षत्रमंडलाशीं—या नीलवर्ण संगमरवरी भूमीवरील अद्भुत तेजोरत्नांशीं—आपल्या पूर्वजांनीं इतका दाट परिचय करून घेतला होता कीं, तीं वाटेल त्या ठिकाणीं, वाटेल तेव्हां, त्यांना अगदीं बरोबर वेळ सांगत! अझून देखील कांहीं कांहीं

ठिकाणीं अशा रीतीनें वेळ सांगणारे वृद्ध गृहस्थ आहेत. परंतु इतर सर्व कलांप्रमाणें ही कलाहि आपल्या पूर्वजांचा अचाट उद्योग, अप्रतिम कल्पना, विलक्षण कर्तृत्वशक्ति आणि आपला—हल्लींच्या त्यांच्या वंशजांचा—आळस, परावलंबन, दुबळेपणा, कर्तृत्वशून्यता यांमधील जमीनअस्मानाचा फरक दाखवून आपल्या पदरीं मूर्खपणा बांधते. बरें, हल्लीं हिंदुस्थानांत जे लोक घड्याळें वापरीत आहेत, त्यांपैकीं त्यांचा खरा उपयोग करणारे किती निघतील? हौस, चैन किंवा 'फ्याशन' याकरितांच बहुतेक जण वापरीत असतात. ह्या निर्जीव वस्तूपासून खरोखर किती तरी गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. 'टिक्' 'टिक्' करून हें मनुष्याला सांगत असतें कीं, 'बाबारे! ऊठ, उद्योगाला लाग; 'घटका गेली, पळें गेलीं, तास वाजे झणाणा, आयुष्याचा नाश होतो; राम कां रे ह्मणाना?'। तें आणखी असें ह्मणत असतें कीं, 'बा, मनुष्यप्राण्या! तुझ्यासारख्या मानवी कारागिरापासूनच माझा जन्म, तों माझी रचना इतकी नाजुक आणि गुंतागुंतीची मग जो तुझा देह विश्वशिल्प्यानें निर्माण केला, त्याची रचना किती अद्भुत आणि अतर्क्य असेल? तूं माझा निर्माणकर्ता ह्मणून तुझी मी इतकी सेवा करतें, आणि तुझी सर्व प्रकारें काळजी वाहणाऱ्या परमेश्वराकडे तूं ढुंकूनहि पाहूं नयेस? काय हा मूर्खपणा?' घड्याळापासून दुसरा एक बोध घेण्यासारखा आहे. घड्याळ आपण योग्य रीतीनें जपून वापरल्यास तें पुष्कळ वर्षें टिकतें. तसेंच आपल्या शरीराची काळजी घेतल्यास तेंहि पुष्कळ वर्षें रहातें. घड्याळांतील एक यंत्र थोडेंसें बिघडलें कीं, त्याचा सर्व व्यवहार बंद पडतो. बहुतांशीं शरीराचेंहि तसेंच आहे. अशी ही उपदेशदायी वस्तु प्रत्येकाजवळ असणें अवश्य आहे; पण त्यांतले त्यांत तिची उपयुक्तता जाणून तिला बाळगणें हें विशेष श्रेयस्कर आहे.

६ असो, आत्मपरीक्षणाचा उपयोग शीलवर्धनाकडे होतो. आज आपल्या हातून चांगलें कृत्य कोणतें झालें, वाईट कोणतें झालें; चांगलें झा-

त्यास तसेंच पुढें करण्याविषयीं निश्चय, वाईट झाल्यास तें होण्याचें कारण, त्याबद्दल पश्चात्ताप; तसलें पुन्हां न होऊं देण्याविषयीं खबरदारी, आणि ज्यांच्या विचारानें आपलें अंतःकरण पुनीत होईल अशीं सद्वचनें त्यांत लिहावीं. त्यांचें वारंवार मनन करावें. त्याचप्रमाणें आपल्या आंगच्या सद्गुणांचा विकास कसा करावा, दुर्गुण कसे नाहींसे करावे, याचाहि त्यांत विचार करावा. 'संतांचें एक वचन ह्मणजे एक मूक–व्याख्यान असतें.' सद्वचनाच्या योगानें ज्ञान उत्पन्न होतें, ज्ञानानें विवेक जागृत होतो; आणि विवेकानें अंतःकरणांत समता आणि शुद्धि येते. वेळेचा अपव्यय होण्याचे जे दुसरे कांहीं मार्ग आहेत, ते चट सारे विवेकानें बंद होतील.

विवेकाचें फळ तें सुख । अविवेकाचें फळ दुःख ।
आनंद सांडोनियां शोक । कैसा घ्यावा ॥

असा श्रीसमर्थांचा उपदेश आहे. वेळेचा सदुपयोग करावयाचा असेल, ऐहिक आणि पारमार्थिक सुख उपभोगावयाचें असेल, समाज किंवा राष्ट्र यांच्या उन्नतीस कारणीभूत अशी आत्मोन्नति साधणें असेल, तर विवेकाची कास धरून आत्मपरीक्षण केलें पाहिजे.

७ रोजनिशी[१] आणि आत्मपरीक्षण हीं दोन्ही साधनें आत्मोन्नतीला अत्यवश्य आहेत. एक ऐहिक सुखप्राप्तीस साधन आहे, आणि दुसऱ्याच्या योगानें परमार्थाची वाट सुगम होते. रोजनिशीनें प्रापंचिक गोष्टी व्यवस्थित होऊन नित्य क्रमाला सुरेख वळण लागतें; व आत्मपरीक्षणाच्या योगानें

---

१ हें सर्व जरी येथें सांगितलें आहे, तरी ज्याची त्यानें आपली व्यवस्था आपल्या परिस्थितीप्रमाणें केली पाहिजे. एकाच कुटुंबांतील तीन माणसांची निरनिराळ्या तीन प्रकारची स्थिति असते. तेव्हां सर्वांनाच लागू पडतील असे नियम या वेळेचा व्यय करण्याच्या बाबतींत घालून देणें अशक्य आहे; आणि प्रस्तुत निबंध लेखकाचा तितका अधिकारहि नाहीं.

वाईट संवई टाकून देऊन चांगल्या स्वीकारतां येतात, आणि अंतःकरण शुद्ध करितां येतें. कित्येक वाचक येथें असा प्रश्न विचारतील कीं, 'तुकाराम, रामदासादिकांनीं कोठें रोजनिशा आणि आत्मपरीक्षणें ठेविलीं होतीं? मग त्यांची नाहीं का आत्मोन्नति झाली?' त्यास उत्तर येवढेंच कीं साधुसंत कांहीं विशिष्ट कार्यासाठीं निर्माण होत असतात; त्यांची सर्व तयारी मूळपासूनच असते. त्यांच्याशीं सामान्य जनांची तुलना करणें गैर आहे. असो; तर-आपण प्रपंच आणि परमार्थ हे दोन्ही साधले पाहिजेत. परमार्थ सोडून निव्वळ प्रपंच करणें हा मूर्खपणा आहे; आणि प्रपंचत्याग करून परमार्थभजनीं लागणें हेंहि सर्वांशीं विहित नाहीं, "संसारार्णविं भिजा गड्यांनो! संसारार्णविं भिजा । परंतु परमार्थसाधनातें साधा यांतच मजा ॥" या अनंतफंदींच्या उक्तीप्रमाणें दोन्ही गोष्टी केल्या तरच जीवितसाफल्य. त्या करितांना.

उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् ।
आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ॥
बंधुरात्मात्मनस्तस्य येनात्मैवात्मना जितः ।
अनात्मनस्तु शत्रुत्वे वर्तेतात्मैव शत्रुवत् ॥

आपला उद्धार आपणच करावा; आपली अधोगति करून घेऊं नये. आपले हितकर्ते बंधु आपण आहोंत. व आपले शत्रुहि आपणच. ज्यानें आत्मसंयमन केलें आहे तोच स्वतःचा बंधु. परंतु ज्याचा आपणा स्वतः-वर ताबा नाहीं तो स्वतःचाच शत्रु होय. या भगवद्वचनावर लक्ष ठेवून वागावें; आपल्या दुष्ट मनोवृत्ति आकळून टाकाव्या आणि ह्या लोकीं धन्यता मिळवून पारमार्थिक सुखाचीहि जोड करून घ्यावी.

८ आतां शेवटीं श्रेष्ठ पुरुषांनीं आपल्या फावल्या वेळाचा सदुपयोग करण्याचे कांहीं मार्ग सांगितले आहेत त्यांचा विचार करूं.

कलाशास्त्रविनोदेन कालो गच्छति धीमताम् ।
व्यसनेन तु मूर्खाणां निद्रया कलहेन वा ॥

या सुभाषितांत बुद्धिवंतांचे मुख्य व्यवसाय तीन सांगितले आहेत. कलांचा अभ्यास, शास्त्रांचें अध्ययन, किंवा मनोरंजनार्थ विनोद करणें. वेळेचा चांगला उपयोग करण्याचे आणखी दुसरे मार्ग पुष्कळ आहेत. परंतु या सर्वांमध्यें सद्ग्रंथवाचनासारखा सर्वांगांनीं उपयुक्त असा दुसरा कोणताही मार्ग नाहीं. या मार्गानें मनाची करमणूकची करमणूक होऊन पुढें उपयोगी पडेल असें ज्ञान मिळतें. शिवाय वाचन अमक्याच वेळेला वाचलें पाहिजे असें नाहीं; तें वाटेल तेव्हां आणि वाटेल त्या ठिकाणीं करतां येतें. अखेरीस,

अरे हें पाहिलेंचि पाहावें। विवरलेंचि मागुती विवरावें॥
वाचिलेंचि वाचावें । पुनः पुनः ॥
अखंड येकांत सेवावा । अभ्यासचि करित जावा ।
काळ सार्थकचि करावा । जनासहित ॥

हा समर्थांचा उपदेश वाचकांपुढें ठेवून हें प्रकरण संपवितों.

उपसंहार.

The[1] applause of a good actor is due to him at whatever·

---

१ चांगला नट कोणत्याहि प्रवेशांत निघून गेला, तरी त्याला टाळी ही मिळावयाचीच. ज्ञानी मनुष्याच्या जीविताचेंहि असेंच आहे; तो पूज्य व सद्गुणी आहे हें दाखविण्याकरितां तो थोडींच वर्षें जगला तरी चालतें; जेव्हां तो तसा नसतो, तेव्हां तो वाजवीपेक्षां फाजील वर्षें जगला; आणि जोंपर्यंत तो तसा (पूज्य व सद्गुणी,) आहे, तोंपर्यंत तो किती दिवसपर्यंत तसा राहील हें विशेष महत्वाचें नाहीं. अखेरीपर्यंत तो तसा राहिला म्हणजे झालें.—स्टील.

scene he makes his exit. It is thus in the life of a man cf sense, a short life is sufficient to manifest himself a man of honour and virtue; when he ceases to be such he has lived too long, and while he is such, it is of no consequence to him how long he shall be so, provided he is so to his life's end. —Steele.

वेळ अत्यंत चंचल व महत्वाची आहे हें जाणून मनुष्यानें आत्मोन्नति करण्यास लागावें; वाटेंत जागोजाग त्यास अडचणी आहेत; नानातऱ्हेचे मोहपाश आहेत; ते सर्व विवेकाचे साहाय्यानें दूर करावे. त्याच्याच जोरावर प्रपंचांत 'सावधान राहून परमार्थ करावा सर्वव्यापी जगदीशापासूनच धन्यता मिळविण्याची सात्विक महत्वाकांक्षा धरावी परंतु

जों हें स्वस्थ तनू, जरा वसतसे जों दूर, जों इन्द्रियें ।
शक्तें, कीं सरलें न आयु पुरतें, तों पंडितानें स्वयें ॥


हें सर्व उरकून घ्यावें. लहानपणापासून जर आयुष्याचा सद्व्यय झाला असेल तरच वृद्धापकाळ आनंदांत जातो. सेनेका ह्मणतो "अगदीं लक्ष-न देतां, संथपणानें चाललेले माझे हे क्षणिक दिवस भरले ह्मणजे मी अगदीं समाधानपूर्वक देहत्याग करीन. पण सर्व लोकांना प्रसिद्ध आणि स्वतःला मात्र पारखा अशा मनुष्याला काळानें अवचित गाठलें तर त्याची काय बरें स्थिति होईल? मृत्यु ह्मणजे त्याला एक जबर अरिष्टच." अंतीं जेणेंकरून सुख होईल असेंच सर्व आयुष्यभर वर्तन असावें. सत्तर वर्षें सरासरीनें आयुष्य धरून एका गृहस्थानें त्याचा

आढावा[1] काढला आहे; त्यावरून पाहतां सत्तर वर्षांतलीं तेरा वर्षें किंवा सरासरीनें आयुष्याचा एक षष्ठांश भाग आपण उद्योगांत घालतों, आणि याचाहि जर आपण आत्मोन्नति करण्यांत उपयोग केला नाहीं तर आपल्या मूर्खपणाला जगांत दुसरी जोडच नाहीं.

सा रम्या नगरी महान् स नृपतिः सामंतचक्रं च तत् ।
पार्श्वे तस्य च सा विदग्धपरिषत्ताश्चंद्र बिंबाननाः ॥

आढावा[1].

जमा	वर्षें	खर्च	वर्षें
७० वर्षें सरासरी आयुष्य			



व. म.

२४—९॥ झोंप.
११—८ काम.
११—८ खेळ.
५—१० खाणें पिणें.
५—१० हिंडणें फिरणें.
२—११ पोषाक डामडौल.
१—५॥ आजारीपणा.
१—५॥ किरकोळ कर्तव्यें.
१—५॥ विचार.
१—५॥ गप्पागोष्टी.
१—५॥ वृथा कालक्षेप.

७०

लोकमित्र स. १९०४ अं. ८–९.

उन्मत्तः स च राज पुत्रनिवहस्ते बंदिनस्ताः कथाः ।
सर्वं यस्य वशादगात्स्मृति पथं कालाय तस्मै नमः ॥

वैराग्य शतक.


अशा प्रकारच्या पराक्रमी काळ महाराजांची जोंपर्यंत वक्रदृष्टी फिरली नाहीं, तोंपर्यंत मनुष्यानें मोहपाशांत न पडतां, शीलवर्धन, आत्मोन्नति किंवा उच्च प्रतीचें ऐहिक व पारमार्थिक सुख हीं साध्य करून घ्यावीं. जे सच्छील आहेत, ज्यांचे विचार उन्नत आहेत, त्यांस आपल्या वेळेचा व्यय कसा करावा हें सांगणें नको; बाकीच्यांनीं वर सांगितल्याप्रमाणें वेळेचा व्यय करावा.

श्रीरामचंद्रार्पणमस्तु ।



शुद्धिपत्र.

पान	ओळ	अशुद्ध	शुद्ध
४	टीप. ३	संभाजी महाराजांच्या	संभाजीमहाराजांच्या
११	५	स्वप्न सदृशी	स्वप्नसदृशी
,,	,,	रोगादि संकुला	रोगादिसंकुला
,,	१६	जाई जणें	जाईजणें
३९	१८	श्रीमन्नारायणराव	श्रीमंत नारायणराव
४१	१७	bsolve	resole





परिशिष्ट.

भाग पहिला.

१ तो काळ, लोक ज्याला वश जैसे घन समस्त वाताला, ॥
देतां योग वियोग श्रम लव ज्याच्या नसेचि हाताला. ॥ १ ॥
लीलेनेंचि सुदुर्घट घडवी, तो प्रभु न होय काळ कसा ? ॥
विघडी घडींत घडिलें अवघडहि निरभिमान बाळकसा. ॥ २ ॥
जेथें नृप धर्म, गदाधर भीम, महास्त्रशस्त्रपटु जिष्णु ॥
गांडीव चाप अद्भुतशक्ति, सखा कृष्ण हा स्वयें विष्णु. ॥ ३ ॥
ऐसें अत्यंताद्भुत पुण्य शरीरास्त्रशस्त्रदैव बळ ॥
तेथेंहि विपत्ति असी दावी, **हा काळ सर्वथा प्रबळ!** ॥ ४ ॥

—मोरोपंत.

२ क्षणभंगुर संसार याचा भरंवसा नाहीं ॥
दुर्लभ नरतनु गेल्या मग तूं पडशिल पस्ताई ॥

—मुक्ताबाई.

३ काळें खादला हा अवघा आकार । उत्पत्ति-संहार घडामोडी ॥१॥

—तुकाराम.

४ Life is a lightening of breath;
Fame but a thunderclap at death.—J. Montgomery.

५ —We are such stuff
As dreams are made of, and our little life
Is rounded with sleep.—Shakspeare.

६ What is the life of man? Is it not to shift from side to side, from sorrow to sorrow, to button up one cause of vexation and to unbutton another?—Sterne.

७ Is life a hundred years, or e'er so few?
'Tis repetition all and nothing new;
A fair—where thousands meet but none can stay,
An[१] inn—where travellers bait and then post away.
—Soame Jenyns.

भाग दुसरा.

१ नरदेहाचें उचित ॥ कांहीं करावें आत्महित ॥
येथानुशक्त्या चित्तवित्त ॥ सर्वोत्तमीं लावावें ॥ १ ॥
—रामदास.

२ करावे सायास आपुल्या हिताचे । तेथें आलियाचें मनुष्यपण ॥
—तुकाराम.

३ सावध सदां असावें संसारीं स्वहित-कृत्य लक्षावें; ॥
पुरुषार्थाचें साधन बा ! धनसें हें शरीर रक्षावें ॥ १ ॥
—मोरोपंत.

४ What right, what true, what fit we justly call,
Let this be all my care, for this is all.
—Pope.

---

१ या ओळीशीं समानार्थक असें नाथांचें पुढील वचन पहा;
'वाटसरू वाटा आले । प्रातःकाळीं उठून गेले ॥'

भाग तिसरा.

१ दुश्चित्तपणासवें आळस । आळसें निद्राविळास ॥
निद्राविळासें केवळ नास । आयुष्याचा ॥

—रामदास.

२ Wild ambition, like a ravenous wolf,
Spurr'd on by will, and seconded by power
Must make a universal prey of all,
And last devours itself.—Dryden.

३ Here runs the mountainous and craggy ridge
That tempts ambition. On the Summit, See,
The seals of office glitter in his eye;
He climbs, he pants, he grasps them. At his heels,
Close at his heels, a demagogue ascends
And with a dexterous jerk soon twists him down,
And wins them, but to lose them in his turn.
—Cowper.

४ Alas! what man's condition can be worse
Than his, whom plenty starves and blessings curse?
The beggars but a common fate deplore;
The rich poor man's emphatically poor.—Cowley.

५ Where pleasure prevails, all the greatest virtues lose their power.—Tulley.

६ A man of pleasure is a man of pain—Young.

भाग चौथा.

१ शिंक जांभई खोकला । तितुका काळ व्यर्थ गेला ॥
श्वास उच्छ्वास नीघतो । तितुक्या काळ व्यर्थ जातो ॥
पात्या पातें न लागत । तितुकें वय व्यर्थ जात ॥
लागे अवचित उचकी । तितुकें वय काळ लेखी ॥
ह्मणे रामी रामदास । होतो **आयुष्याचा नाश** ॥

२ All things are best fulfilled in their due time;
And time there is for all things.—Milton.

३ There is a tide in the affairs of men,
Which taken at the flood, leads on to fortune.—
Shakspeare.

४ Unhappy he who does this work adjourne,
And to-morrow would the search delay,
His lazy morrow will be like to-day,
* * * * * For yesterday was once to-morrow;
That yesterday is gone and nothing gained
And all thy fruit-less labour will thus be drained;
For thou hast more to-morrows yet to ask
And will be ever to begin thy task
Who like the hind-most charriot wheels are curst.
Still to be near but never to reach the first.—Dryden.

भाग पाचवा.

१ विचारावांचून । न पविजे समाधान ॥

—तुकाराम.

२ जेथें बहु विचार तेथें ईश्वर अवतार ।
मागें झाले थोरथोर धक्के चपेटे सोसोनी ॥

—श्रीसमर्थ.

३ राजयोगें भक्तियोगें । ज्ञानयोगें वैराग्ययोगें ।
जगदुद्धार लागवेगें । विवेकें संत करिताती ॥ १ ॥
विवेकें संतीं काय केलें । पूर्णापूर्ण व्यापक विवरिलें ।
आत्मा निरंजन विभागून दिधलें । पूर्ण व्यापक निरंजन ॥ २ ॥

—वेणूबाई (समर्थशिष्या)कृत निवृत्तिराम.

४ Believe not those that lands possess
And shining heaps of useless ore,
The only lords of happiness
But rather those that know
For what kind fates bestow
And have the art to use the store,
That have the generous skill to bear
The hated weight of poverty.—Creech.

५ Man courts happiness in a thousand shapes, and the faster he follows it, the swifter it flies from him. Almost every thing promises happiness to us at a distance; but when we come nearer to it, either we fall short of it, or it falls short of our expectation.—Tillotson.

भाग सहावा.

१ म्हणोनि जें जें उचित । आणि अवसरेंकरूनि प्राप्त ।
तें कर्म हेतुरहित । आचरें तूं ॥ १ ॥

श्रीज्ञानेश्वर महाराज.

२ नाहीं देह्याचा भरवसा । केव्हां सरेल वयसा ।
प्रसंग पडेल केव्हां कैसा । कोण जाणे ॥ १ ॥
याकारणें सावधान असावें । जितुकें होईल तितुकें करावें ।
भगवद्भक्तीनें भरावें । भूमंडळ ॥ २ ॥
आपणास जें जें अनुकूळ । तें तें करावें तात्काळ ।
होईना त्यास निवळ । विवेक उमजावा ॥ ३ ॥
सुखा अंग देऊं नये । प्रेत्न पुरुषें सांडों नये ।
कष्ट करितां त्रासों नये । निरंतर ॥ ४ ॥
गुप्त तेंचि प्रगटवावें । असाध्य तेंचि साधावें ।
कानडेंचि अभ्यासावें । सावकाश ॥ ५ ॥

—श्री समर्थ.

३ संसार दों दिसांचा यश जोडी जो कुलीन तोचि तरे ॥

—मोरोपंत.


४ Life must be measured by action, not by time

—Dr. Fuller.


५ Not enjoyment, and not sorrow
Is our destined end or way;
But to act that each to-morrow
Finds us further than to-day


* * * * * * *

In the world's broad field of battle,
In the bivouac of life,
Be not a dumb-driven cattle;
Be a hero in the strife.
Trust no future, however pleasant;
Let the dead past bury its dead;
Act—act in the living present,
Heart within and God o'er head.—Longfellow.



क्लॉक्स आणि **टाईम पिसेस.**







सर्व मेकरचीं लहानमोठ्या आकाराचीं कचेरी व खासगी उपयोगाचीं, भिंतीस लावण्याचीं, टेबलावर टेवण्याचीं, व क्यारेज (मुशाफरी) क्लॉक्स व टाईम पिसेस.


क्लॉक्स—८ दिवसांचे चावीचें तास अर्धा तास वाजणारें ८ इंच डायल (तबकडी) १९ इंच उंची किं० रु० १०, ११, १२. १० इंच डायल २२ इंच उंची किं० रु० १२, १३, १४. डायल १२ इंच उंची २४ इंच किं० रु० १४, १६, १८. आफीस रेग्युलेटर, १२ इंच डायल ३२ इंच उंची किं० रु० १७, १९, २५. गजर (अलार्म) किंवा तारीखसह १ रुपया जास्त. रेलवे पार्सलनें मागवा.

टाईम पिसेस—एक दिवसाचे किल्लीचें २ इंच डायल किं० रु० २।≈ ते ३. इंच ४ डायलचें किं० रु० २॥ ते ३॥. अलार्मचें किं० रु० ४॥. ३. पंध्रा मिनिट अलार्मचें किं० रु० ५॥ ते ७.

क्यारेज टाईम पिसेस—एक दिवसाचें ३ इंच डायल ७ इंच उंची तास अर्धा तास वाजणारें किं० रु० ८॥ ते ९॥. अलार्मसह किं० रु० ९ ते १०. आठ दिवसांचे चावीचें चामड्याच्या केससह किं० रु० १८ ते २५. वाजणारें रु० ६५ ते ८०. तास बाजा वाजणारें किंवा अलार्मचें किं० रु० ५ ते ६. इंग्रजी क्याटलाग फुकट.

जी. बी. नाईक आणि कंपनी, मुंबई आणि **पुणें.**

जगप्रसिद्ध
व
लोकप्रिय



रास्कोप पेटंट व रास्कोप सिस्टिम वॉचेस.

या घड्याळांची इतकी प्रसिद्धी झाली आहे कीं त्यांबद्दल कोणत्याच प्रकारची तारीफ करण्याची विशेष जरूर नाहीं. हीं टिकाऊ, दिखाऊ, बरोबर वेळ दाखविणारीं असून काळजीपुरःसर वापरल्यास दुसऱ्या वाचची जरूर लागणार नाहीं.

खरें रास्कोप पेटंट—ग्यारंटी वर्षें १० किं० रु० १५ ते १८. चांदीचें किं० रु० ३० ते ३५. **वेस्टेंड "XL"** रास्कोप सिस्टिम वॉच किं० रु० १० ते ११. ग्यारंटी वर्षें ४. **इमिटेशन रास्कोप**—ग्यारंटी वर्षें ३, २, १, किं० रु० ८॥, ७॥, ५॥, ग्यारंटीखेरीज स्वस्त किंमतीचीं रास्कोप सिस्टीम वॉचेस किं० रु० ४ ते ३. फ्यानसी डायल रु० १ ते ॥॥ जास्त. प्रत्येक वॉचबरोबर कांच, कमान, सुंदर पेटी फुकट मिळेल. इंग्रजी क्याटलाग पहा.

जी. बी. नाईक आणि **कंपनी मुंबई व पुणें.**


Stop thief!!
Time steals a march on you
Plese ask for an accurate Time-Indicator
from G. B. Naik & Co., Bombay & Poona.